


# हॅलो प्रभात

PRGI NO.MAHMAR/25/A3118

■ संपादक : संजीव शाळगावकर | पुणे आवृत्ती

■ मुंबई ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ■ वर्ष : ०१ ■ अंक : १६७ ■ सोमवार, १८ मे २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४+२



## भाड्याने देणे

ऑफिससाठी उपयुक्त असा २५० स्के.फू.ब्लॉक भाड्याने देणे आहे.

•इंडोशिवा ॲसेट•

दुसरा मजला, गणपती मंदिरसमोर विश्रामबाग, सांगली.

संपर्क

7517219001

9011889001



# शेतकऱ्यांसाठी दिलासादायक संकेत : 30 जूनपूर्वी कर्जमाफीचा निर्णय होणार

## मुख्यमंत्री फडणवीस : पुण्यात 'ॲग्री हॅकॅथॉन 2026' कार्यक्रमानंतर मोठी घोषणा

**पुणे : हॅलो प्रभात**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक घडामोड समोर आली असून राज्य सरकारकडून लवकरच कर्जमाफी जाहीर होण्याची शक्यता आहे. पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या सिंचन नगर मैदानात आयोजित "पुणे ॲग्री हॅकॅथॉन २०२६" पारितोषिक वितरण व समारोप समारंभानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत महत्त्वपूर्ण संकेत दिले.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शेतकरी कर्जमाफीसंदर्भातील संपूर्ण प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून यावर मंत्रिमंडळात सविस्तर चर्चा झाली आहे. काही जिल्ह्यांकडील आकडेवारी आणि माहिती मागवण्यात आली असून ती प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. सर्व प्रक्रिया पूर्ण करून ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या घोषणेमुळे राज्यातील शेतकरी वर्गात मोठी अपेक्षा आणि दिलासा निर्माण झाला आहे.



**कर्जमाफी अंतिम टप्प्यात असल्याचे स्पष्ट**

याच कार्यक्रमात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने काम करत असून शेतमालाला योग्य आणि स्थिर बाजारभाव मिळावा यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा ही सरकारची प्राथमिक भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्री. भरणे यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. वीज सवलत, अनुदान वितरण प्रणालीत सुधारणा आणि कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे शेतकऱ्यांना थेट लाभ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली कर्जमाफीसाठी मोठे आंदोलन झाले होते. त्यावेळी सरकारने जून महिन्यात निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे आता ३० जूनपूर्वी कर्जमाफी होणार असल्याच्या चर्चेला अधिक बळ मिळाले आहे. तसेच महाराष्ट्र हे एआय तंत्रज्ञानाधारित कृषी धोरण स्वीकारणारे देशातील पहिले राज्य असल्याचेही कृषिमंत्र्यांनी सांगितले. खतपुरवठ्यातील काही अडचणी असून त्या लवकरच दूर केल्या जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले. या सर्व घडामोडींमुळे राज्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष आता सरकारच्या अंतिम निर्णयाकडे लागले आहे.

# पार्थ पवारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट!

**▶▶ राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण ; फडणवीसांकडून दुजोरा**

**पुणे : हॅलो प्रभात**

राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संबंधित चर्चांदरम्यान एक महत्त्वाची भेट समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र आणि राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

या भेटीबाबत विविध माध्यमांमध्ये वेगवेगळे तर्क-वितर्क सुरू असताना मुख्यमंत्र्यांनी स्वतः याला दुजोरा दिला आहे. "पार्थ पवार मला काल येऊन भेटले. काही प्रशासकीय आणि काही राजकीय विषयांवर चर्चा झाली," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, दोन्ही पक्ष हे मित्रपक्ष असल्याने अशा भेटी होणे ही मोठी किंवा असामान्य बाब नाही. "ते मला भेटायला आले, यात विशेष काही नाही. काही प्रशासकीय मुद्दे आणि काही राजकीय विषयांवर चर्चा झाली, असे त्यांनी नमूद केले.



या भेटीमागे नेमका राजकीय अर्थ काय, याबाबत सध्या विविध चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत हालचाली आणि राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, या भेटीबाबत कोणतीही अधिकृत राजकीय घोषणा किंवा मोठा निर्णय झाल्याचे स्पष्ट झालेले नाही. मात्र या चर्चेमुळे राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले असून पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' : मुख्यमंत्री

## प्रथम पुरस्कार अजित पवार यांच्या नावाने देणार

**पुणे : हॅलो प्रभात**

शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा-२०२६'च्या समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

# ऊस शेतीत एआय तंत्रज्ञानावर प्रशिक्षणास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

राजारामनगर (ता. वाळवा) येथील आरआयटी कॉलेज येथे 'ऊस शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर आयोजित प्रशिक्षण शिबिरास ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम राजारामबापू सहकारी साखर कारखाना, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (VSI) आणि कृषी विज्ञान केंद्र बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.



या प्रसंगी माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांनी व्हीएसआय व केव्हीकेच्या शास्त्रज्ञांशी शेतकऱ्यांचा संवाद घडवून विविध शंकांचे निरसन केले. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक दादा पाटील, उपाध्यक्ष विजयराव पाटील, केव्हीकेचे डॉ. विवेक भोईटे व व्हीएसआयचे डॉ. समाधान सुरवसे प्रमुख उपस्थित होते. तज्ज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ऊस शेती अधिक शाश्वत, अचूक आणि उत्पादनक्षम होणार असल्याचे स्पष्ट केले.

फसल कंपनीचे नितीन शिंदे यांनी सेन्सर तंत्रज्ञानाची माहिती देत त्याचे फायदे व वापर पद्धती सांगितली. मॅप माय क्रॉपचे अरुण पडोल यांनी मोबाईल ॲपद्वारे पीक निरीक्षण, रोगनियंत्रण व उत्पादन वाढीबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात डिजिटल तंत्रज्ञान, सेन्सर प्रणाली व ॲप आधारित पीक व्यवस्थापन यावर सविस्तर माहिती देण्यात आली.


शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आमदार जयंतराव पाटील यांनी समर्पक उत्तरे देत शंका दूर केल्या. निवास खोत, विकास खांडेकर, रामचंद्र सावंत, किशोर खांडेकर यांच्यासह शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमास विविध पदाधिकारी, शास्त्रज्ञ आणि मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# आपत्कालीन परिस्थितीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जिल्ह्यात पडणाऱ्या पर्जन्यमानामुळे पुरस्थिती निर्माण होते .या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनान पूर्णपणे सज्ज असल्याची ग्वाही जिल्हाधिकारी डॉ .विजय राठोड यांनी दिली.राजाराम बंधारा येथे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास यंत्रणा सज्ज असावी या उद्देशाने जिल्हाधिकाऱ्यांनी साहित्य आणि प्रात्यक्षिकाची आज पाहणी केली.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत राजाराम बंधारा येथे देखभाल,दुरुस्ती,प्रात्यक्षिक व प्रशिक्षण या उद्देशाने तीन



दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रारंभी जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रशिक्षणामध्ये सामील झालेल्या आपदा मित्र व आपदा सखींची आस्थापूर्वक चौकशी करून त्यांना आपत्कालीन स्थितीमध्ये येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच रेस्क्यू बोट,लाइफ जॅकेट, लाइफ रिंग, सॉकर कटर, हायड्रोलिक कटर, रेस्क्यू रोप, इमर्जन्सी फ्लोटींग लाईट्स आदींची प्रत्यक्ष पाहणी श्री राठोड यांनी यावेळी केली. याप्रसंगी करवीर तहसीलदार स्वप्निल पवार अग्निशमन दलाचे अधिकारी दस्तगीर मुल्ला, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ यांच्यासह आपदा मित्र व सखी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजारामबापू पाटील यांच्या कार्यावर संशोधन अध्यासनाची गरज : डॉ. माणिकराव साळुंखे

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

लोकनेते राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले असून शासन व सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील माणूस सक्षम केला आहे, असे प्रतिपादन सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थानचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

बेळगाव येथील श्री तुकाराम महाराज सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान



माजी मंत्री जयंतराव पाटील यांनी भूषविले. या वेळी ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक आणि विविध मान्यवर उपस्थित होते.

डॉ. साळुंखे यांनी पुढे सांगितले की, बापूंच्या कार्यावर अधिक संशोधन व लेखन होणे आवश्यक असून विविध विद्यापीठांमध्ये त्यांच्या नावाने अध्यासन सुरू व्हावे. नव्या पिढीला त्यांच्या कार्याची ओळख होण्यासाठी त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी महाराष्ट्राच्या कृषी-औद्योगिक विकासात बापूंच्या भूमिकेचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानावरही विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात बेळगाव, गोवा, नांदेड, पुणे, सांगली यासह विविध भागातील साहित्यिक, कवी व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

# डी. वाय.पी. फिजिओथेरपीला दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये दमदार १०९ गुणांची कमाई करत फिजिओथेरपी कॉलेज संघाने सलग दुसऱ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. विजेत्या संघांना डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त पृथ्वीराज संजय पाटील आणि कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांच्या हस्ते चषक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. फिजिओथेरपी कॉलेजची श्रावणी अशोक जंगटे आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचा सोहम राजेश शिंदे यांना 'उत्कृष्ट खेळाडू' पुरस्काराने सन्मानित



करण्यात आले.

यावेळी बोलताना पृथ्वीराज पाटील म्हणाले, "क्रीडा स्पर्धा म्हणजे केवळ जय-पराजय नव्हे, तर नेतृत्व, शिस्त आणि संघभावना शिकवणारे प्रभावी व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी खेळातून आत्मविश्वास, तंदुरुस्ती आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करावा. पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवून स्पर्धेला नव्या उंचीवर न्यावे. कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी सांगितले, "विद्यापीठाच्या आठ संस्थांमधील तब्बल ८७० खेळाडूंनी सांघिक व वैयक्तिक अशा १० विविध क्रीडा प्रकारांत सहभाग घेतला. शिक्षणाबरोबरच खेळ, एनएसएस, एनसीसी आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो. खेळ विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करतात. या स्पर्धेदरम्यान विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू व संघांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, परीक्षा नियंत्रक अभय जोशी, अधिष्ठाता डॉ. राजेश ख्यालप्पा, प्राचार्य डॉ. चंद्रप्रभू जगमे, डॉ. आर. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. ग्रंथेज ओतारी, डॉ. मनीषा विजापूरकर, क्रीडा संचालक शंकर गोनुगडे, सुशांत कायपुरे यांच्यासह सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व क्रीडा विभागप्रमुख उपस्थित होते. शंकर गोनुगडे यांनी आभार मानले.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष सतेज पाटील आणि विश्वस्त ऋतुराज पाटील यांनी विजेत्या संघांसह सर्व सहभागी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# संक्षिप्त

## चैनीसाठी स्वत:चाच फोडला बंगला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

दारूच्या पार्टीसह चैनीसाठी मित्रांच्या मदतीने पाडळी खुर्द (ता. करवीर) येथील स्वत:च्या मालकीचा बंगला फोडून १५ लाख ५८ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे १२ तोळे दागिने, रोकड, महागड्या वस्तू लंपास केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीला आला. स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने सिद्धार्थ संजय भालकर (वय २३, रा. मंगळवार पेठ, कोल्हापूर) याला बेड्या ठोकून १२ तोळे दागिने हस्तगत केले.

## वादळी वाऱ्यात गोशाळेचे पत्रे उडाले

**फलटण : हॅलो प्रभात**

फलटण तालुक्यातील तरडगाव परिसरात सायंकाळी झालेल्या वादळ आणि वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले. या वादळाचा फटका तरडगाव येथील भैरवनाथ गोपालन संस्थेच्या गोशाळेला बसला असून गोशाळेच्या शेडवरील पत्रे उडून गेल्याने जनावरे उघड्यावर आली आहेत. अचानक आलेल्या वाऱ्यामुळे गोशाळेच्या छतावरील अनेक पत्रे हवेत उडाली. काही ठिकाणी लोखंडी संरचनेचेही नुकसान झाले असून गोशाळेतील जनावरांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## रस्त्यावर वाहने लावल्यास आता थेट गुन्हे

**सोलापूर : हॅलो प्रभात**

मंगळवेढा-सोलापूर महामार्गावरील रस्त्यावर बेशिस्तपणे उभी राहणारी वाहने आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडीची पोलिस प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. मंगळवेढा पोलिसांनी याठिकाणी धडक कारवाई करत ६ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून, यापुढे ररस्त्यात वाहने लावल्यास थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

## दारूच्या वादातून कोरेगावात खून

**कोरेगाव : हॅलो प्रभात**

दारूची बाटली देण्यावरून झालेल्या वादात लोखंडी पाईपने केलेल्या बेदम मारहाणीत एकाचा मृत्यू झाला असून संशयिताला अटक केली. सुभाष परशुराम बर्गे (वय ५८) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी रविंद्र यल्लप्पा शिवनगी ऊर्फ राठोड या संशयिताला अटक करण्यात आली आहे. दुपारी सव्वाएकच्या सुमारास कोरेगाव येथील आझाद चौक ते बाजारपेठ रस्त्यावरील एका देशी दारू दुकानासमोर दारूची बाटली देण्यावरून सुभाष व रविंद्र यांच्यात वाद झाला होता. यातून सुभाष परशुराम बर्गे याच्या डोक्यात, छातीवर व पायावर मारहाण करण्यात आली. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या बर्गे याचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

## संपादकीय

# मोबाईलच्या आभासी जगातून वास्तवाकडे : भारत आनंदी राष्ट्र कधी होणार?



जगातील सर्वाधिक आनंदी देश म्हणून फिनलंड सलग अनेक वर्षे अव्वल स्थानी राहतो, ही बाब आता नवीन राहिलेली नाही. परंतु प्रत्येक वर्षी प्रसिद्ध होणाऱ्या जागतिक आनंद निर्देशांकात भारत मागेच का राहतो, हा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. २०२६ च्या जागतिक आनंद अहवालात भारताचे स्थान ११६ वे आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत थोडी सुधारणा झाली असली तरी महासत्ता बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या देशासाठी हे स्थान समाधानकारक म्हणता येणार नाही. विशेष म्हणजे आर्थिकदृष्ट्या संकटात असलेल्या पाकिस्तान नेही भारतापेक्षा वरचे स्थान मिळवले आहे. त्यामुळे हा केवळ क्रमांकांचा विषय नसून आत्मपरीक्षणाची वेळ आहे. आज आनंदाची व्याख्या केवळ आर्थिक समृद्धीपुरती मर्यादित राहिलेली नाही. चांगले आरोग्य, दर्जेदार शिक्षण, सामाजिक सुरक्षा, मानसिक स्थैर्य, सुरक्षित वातावरण, समान संधी आणि परस्पर विश्वास या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे आनंदी समाज. भारतात मात्र आर्थिक प्रगतीच्या चमकदार आकड्यांआड वाढती विषमता, बेरोजगारी, ताणतणाव, मानसिक अस्वस्थता आणि सामाजिक दुरावा लपलेला दिसतो. फिनलंड, डेन्मार्क, आईसलंड, स्वीडन, यांसारखे देश आनंदी राष्ट्रांच्या यादीत सतत वरच्या क्रमांकावर राहतात, कारण त्या देशांनी नागरिकांच्या जीवनमानाला केंद्रस्थानी ठेवले आहे. तेथे शिक्षण आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधा सक्षम आहेत. सामाजिक सुरक्षा मजबूत आहे. भ्रष्टाचार कमी आहे. काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये संतुलन आहे. नागरिकांना भविष्याची भीती नाही. परिणामी, समाजात मानसिक समाधान टिकून राहते. भारताची परिस्थिती मात्र वेगळी आहे. एका बाजूला महानगरांमध्ये उच्चभ्रू जीवनशैली झपाट्याने वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागात शेतकरी, कामगार आणि निम्न मध्यमवर्ग मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करताना दिसतो. शहर आणि गाव यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. नैसर्गिक संकटे, शेतीतील अनिश्चितता, वाढती महागाई आणि रोजगाराचा तुटवडा यामुळे सामान्य नागरिकांच्या जीवनात असुरक्षितता वाढली आहे. आर्थिक वाढीचे फायदे सर्व स्तरांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नसल्याने समाजात असंतोष निर्माण होत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे तरुण पिढीचे वाढते मानसिक असंतुलन. आजचा युवक सोशल मीडियाच्या आभासी जगात अडकत चालला आहे. फेसबूक आणि द यांसारख्या माध्यमांवरील अखंड उपस्थितीमुळे तुलना, असुरक्षितता, न्यूनगंड आणि ताण वाढत आहे. दिवसभर रिल्स आणि आभासी लोकप्रियतेच्या मागे धावणारी तरुणाई वास्तव जीवनापासून दूर जात आहे. संशोधनांनीही सोशल मीडियाचा अतिवापर मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करतो हे स्पष्ट केले आहे. याउलट स्वीडन सारख्या देशांनी विद्यार्थ्यांना आणि तरुणांना डिजिटल व्यसनातून बाहेर काढण्यासाठी विशेष मोहिमा सुरू केल्या आहेत. भारतातही अशा उपक्रमांची तातडीची गरज आहे. कारण आनंदी राष्ट्र निर्माण करण्यासाठी मानसिकदृष्ट्या सक्षम आणि आत्मविश्वासी तरुण पिढी आवश्यक असते. देशात शिक्षण आणि आरोग्याच्या क्षेत्रात अजूनही मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. अनेक गावांमध्ये डॉक्टर नाहीत, शाळांमध्ये शिक्षक नाहीत, रुग्णालये अपुरी आहेत, तर शहरांमध्ये उपचारांचा खर्च सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या अहवालानुसार गेल्या दशकात कुटुंबांचा मासिक खर्च दुपटीने वाढला आहे. महाराष्ट्रातच आरोग्यावरील खर्चात ४६ टक्क्यांची वाढ झाली आहे. उत्पन्न वाढण्यापेक्षा खर्च अधिक वेगाने वाढत असल्याने नागरिकांच्या जीवनातील ताण वाढत आहे. भारतीय संस्कृतीत आनंदाला नेहमीच आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांशी जोडले गेले आहे. 'आनंद हा मानण्यात आहे' ही मानसिकता भारतीय समाजाची ताकद आहे. परंतु केवळ आध्यात्मिक विचार पुरेसे नसतात. त्यासाठी जगण्याच्या मूलभूत गरजाही पूर्ण व्हाव्या लागतात. पोटाची चिंता, शिक्षणाचा खर्च, नोकरीची असुरक्षितता आणि आरोग्याची भीती यामध्ये माणूस आनंदी राहू शकत नाही. महासत्ता होण्याचा मार्ग केवळ जीडीपी वाढीतून जात नाही. तो नागरिकांच्या चेहऱ्यावरचे समाधान, सुरक्षिततेची भावना आणि मानसिक स्वास्थ्य यांमधून जातो. भारताला खऱ्या अर्थाने आनंदी राष्ट्र बनवायचे असेल तर सरकार, समाज आणि कुटुंब या तिन्ही पातळ्यांवर बदल घडवावे लागतील. शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था मजबूत करावी लागेल. सामाजिक विषमता कमी करावी लागेल. तरुणांना कौशल्य, रोजगार आणि मानसिक आधार द्यावा लागेल. तसेच सोशल मीडियाच्या अतिरेकातून बाहेर काढून वास्तव जीवनातील नातेसंबंध, संवाद आणि सहजीवनाची जाणीव पुन्हा निर्माण करावी लागेल.

# भव्य बुरुज, तटबंदी आणि बारादरीने सजलेला वेताळगड

**दै. हॅलो प्रभात**

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात वेताळगड या नावाचा सुंदर किल्ला आहे. या किल्ल्याची भव्य तटबंदी, बुरुज व यावरील इमारती आजही शाबूत आहेत. त्यामुळे हा किल्ला पहातांना एक परीपुर्ण किल्ला पाहील्याचे समाधान मिळते. वेताळगड जवळच्या डोंगरात असलेली रुद्रेश्वर लेणीही पहाण्यासारखी आहेत.

**गडाचा परिचय**

औरंगाबादहून अजिंठा लेण्याकडे जार्णाया औरंगाबाद – जळगाव रस्त्यावर औरंगाबाद पासून साधारण ६५ किमी अंतरावर सिल्लोड गाव आहे.सिल्लोडच्या पुढे साधारण १४ कि मी वर गोळेगाव आहे. गोळेगावच्या अलिकडे डाव्याबाजूस उंडणगावाकडे जाणारा फाटा फूटतो. येथून उंडणगाव ५ किमीवर आहे. उंडणगावहुन १२ किमीवर हळदा गाव आहे. हळदा गावापुढे घाट सुरु होतो. या घाटातच हळद्यापासून साधारण ३ किमी अंतरावर वेताळवाडी किल्ला आहे. घाट चढल्या पासूनच वेताळवाडी किल्ला दिसू लागतो. वेताळगड किल्ल्याच्या एका बाजूला हळदा घाट रस्ता झाल्यामुळे या मार्गाने आपण जवळ जवळ किल्ल्याच्या प्रवेशव्दारात पोहोचतो. प्रथम दोन भव्य बुरुज आपले स्वागत करतात. त्यांच्या मागे या या दोन बुरुजां पेक्षा उंच व भव्य बुरुज आहे. त्याला नक्षीदार सज्जा आहे. दरवाजा पर्यंत पोहोचलेल्या शत्रूवर थेट हल्ला करण्यासाठी या बुरुजाची रचना केलेली आहे. दोन बुरुजांमधून फरसबंदी केलेली वाट काटकोनात वळून उत्तराभिमुख प्रवेशव्दाराकडे जाते. या प्रवेशव्दाराचे तोंड जंजाळा किल्ल्याकडे असल्यामुळे याला 'जंजाळा दरवाजा' म्हणत असावेत. दरवाजाची उंची साधारण २० फूट असून त्याच्या दोन बाजूस शरभ शिल्प कोरलेली आहेत. दरवाजाच्या आतील बाजूस देवड्या आहेत. दरवाजाच्या वर जाण्यासाठी जीना






आहे. या जीन्याने वर गेल्यावर दरवाजाच्या छतावर एक चौकोनी खाच केलेली आहे. त्यातून उतरणारा जीना आपल्याला एका मोठ्या खोलीत घेऊन जातो. दरवाजावर उभे राहील्यावर आपल्याला लांबवर पसरलेली तटबंदी, त्या खालचा हळदा घाट व सर्वात खाली वेताळवाडी धरण पहायला मिळते. तर वरच्या बाजूला बालेकिल्ल्याची तटबंदी पहायला मिळते.

प्रवेशव्दारावरून खाली उतरून उजव्या बाजूला थोडेसे वर चढल्यावर एक खांब टाके लागते. ते पाहून पुन्हा दरवाजापाशी येऊन तटबंदी उजव्या हाताला ठेऊन चालू लागल्यावर उजव्या बाजूस भव्य बुरुजात जाण्याचा प्रवेश मार्ग दिसतो. पण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वटवाघळे असल्यामुळे आत शिरता येत नाही. थोड पुढे गेल्यावर आपण तटबंदीतील पूर्व टोकाच्या बुरुजापाशी पोहोचतो. येथून दरी उजव्या हाताला ठेऊन चढत गेल्यावर आपण ५ मिनिटात बालेकिल्ल्यावर पोहोचतो. बालेकिल्ल्याच्या पूर्व बुरुजाजवळ एक छोटी घुमट असलेली इमारत आहे. या इमारतीच्या छताला एक झरोका आहे. येथून तटबंदीवर चढून मधल्या बुरुजापर्यंत चालत जावे. मधल्या बुरुजावरून खाली उतरून सरळ चालत गेल्यावर आपल्याला जमिनीत बांधलेले तेल तुपाचे टाक पहायला मिळत. या टाक्याच्या बाजूला धान्य कोठाराची इमारत आहे. या इमारतीच्या समोर एक भग्न इमारत आहे. पुढे गेल्याव्रर नमाजगीर नावाची इमारत (मस्जिद) आहे. नमाजगीरच्या उजव्या बाजूला कोरीव दगड बसवलेली कबर आहे. नमाजगीरच्या समोर तलाव आहे.

किल्ल्याच्या उत्तर टोकावर बारदरी नावाची २ कमान असलेली इमारत दुरुन नजरेत भरते. या इमारतीकडे जातांना डाव्या बाजूला एक इमारत आहे. बारादरी ही किल्ल्याच्या उत्तर टोकाला आहे. या इमारतीत २ कमानींच्या दोन रांगा आहेत. राजघराण्यातील लोकांना उन्हाळ्यात हवा खाण्यासाठी अशी इमारत देवगिरी किल्ल्यावरही बांधलेली आहे. बारादरीतून खालच्या बाजूस किल्ल्याचा मुख्य दरवाजा व त्याखालील वेताळवाडी गाव दिसते.

या किल्ल्याच्या मुख्या दरवाजाकडे जाण्यासाठी बारादरी पासून थोडे मागे येऊन खाली उतरावे पुढे ही वाट बारादरी खालून उतरत खाली जाते. येथे एक बुजलेले टाके आहे. त्याच्या बाजूला तोफ आहे. उजव्या बाजूच्या तटबंदीत चोर दरवाजा आहे. दोन बुरुजात बसवलेले किल्ल्याचे मुख्य प्रवेशव्दार उत्तराभिमुख आहे. प्रवेशव्दार २० फूट उंच असून त्याच्या दोनही बाजूला शरभ शिल्प कोरलेली आहेत. प्रवेशव्दाराच्या आतील बाजूस पहारेकर्यांसाठी देवड्या आहेत. दुसरे प्रवेशव्दार पश्चिमाभिमुख आहे. हे प्रवेशव्दार पाहीले की आपली गड फेरी पूर्ण होते.

•प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण
इतिहास अभ्यासक,व्याख्याते
संपर्क : ९०११८९०२७९



## कृष्णराज महाडिक यांची रावसाहेब पाटील यांच्या निवासस्थानी भेट



**सांगली : हॅलो प्रभात**

भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक हे सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी भाजपा जैन प्रकोष्ठचे प्रदेश उपाध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. युवा मोर्चाच्या संघटन विस्तार आणि बळकटीकरणाच्या पार्श्वभूमीवर ही भेट पार पडली.

या भेटीदरम्यान कृष्णराज यांनी पाटील यांच्या सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील कार्याचा तसेच ते कार्यरत असलेल्या विविध संस्थांचा आढावा घेतला. समाजकारण आणि संघटन बांधणीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल विशेष गौरव व्यक्त करत भाजपा युवा मोर्चासाठी त्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पाटील यांनी कृष्णराज यांची निवड झाल्यामुळे महाराष्ट्रातील युवकांमध्ये, विशेषतः सांगली-कोल्हापूर परिसरातील युवा वर्गात भाजपाविषयी नवचैतन्य निर्माण झाल्याचे सांगितले.

## 'मूल्यांचे जतन ही काळाची गरज' : कुलगुरू डॉ.शिर्के

### प्रा. संजय ठिगळे लिखित 'कधी मनातलं, कधी जनातलं' पुस्तकाचे प्रकाशन

**सांगली : हॅलो प्रभात**

'२१ व्या शतकात आपण ज्या वेगाने प्रगती करत आहोत, त्या पार्श्वभूमीवर आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा विचार करता मूल्यांचे जतन करणे ही काळाची गरज बनली आहे. जतन संस्कृती आणि जतन संस्कार विकसित होणे आवश्यक असून प्रा. संजय ठिगळे यांचे लिखाण या जतन संस्कृतीला चालना देणारे आहे,' असे प्रतिपादन वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

प्रा. संजय ठिगळे लिखित 'कधी मनातलं, कधी जनातलं' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा डॉ. शिर्के यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डे कर होते.



बीजभाषक म्हणून बोलताना शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एम. एस. देशमुख आणि प्रा. सुभाष दगडे यांनी समाजातील आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणाऱ्या लेखकांची आज समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, 'वाढता चंगळवाद आणि नैतिक मूल्यांचे होत चाललेले अध:पतन देशाच्या विकासासाठी मारक ठरत आहे. त्यादृष्टीने तरुणाईने सावध राहणे आवश्यक आहे.'

लेखक म्हणून मनोगत व्यक्त करताना प्रा. संजय ठिगळे म्हणाले, 'चळवळीतील अनुभवांमुळे मला माणसांच्या मनातील भावना समजून घेता आल्या. विशेषतः आर्थिक प्रश्नांची जाण आणि भान असल्यामुळेच हे लिखाण शक्य झाले.'

कार्यक्रमाच्या प्रारंभी धर्मेंद्र पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन विठ्ठल मोहिते यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राजेश ठिगळे यांनी मानले.

या कार्यक्रमास भाग्यश्री पाटील-कासोटे, ज्येष्ठसाहित्यिक प्रा. वैजनाथ महाजन, सिव्हिल सर्जन डॉ. विक्रमसिंह कदम, प्रा. शामराव पाटील, दी. बा. पाटील, प्रमोद चौगुले, प्राचार्य विवेकानंद रणखांबे, मालनताई मोहिते, नामदेव माळी यांच्यासह साहित्य व आर्थिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# टेंभू योजनेचे शिल्पकार स्व. संपतरावजी देशमुख यांना स्मृतिदिनी अभिवादन

## 'संकल्पसिद्ध' प्रेरणास्थळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**कडेगाव : हॅलो प्रभात**

आशिया खंडातील सर्वात मोठ्या टेंभू उपसा जलसिंचन योजनेचे शिल्पकार, दिवंगत आमदार लोकनेते स्व. संपतरावजी देशमुख आण्णा यांना त्यांच्या ३० व्या स्मृतिदिनानिमित्त 'संकल्पसिद्ध' प्रेरणास्थळ, शिवाजीनगर (ता. कडेगाव) येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन कुटुंबीय व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामभाऊ देशमुख, जयदीप देशमुख, ग्रीन पॉवर शुगर्स गोपूजच्या चेअरमन अपर्णाताई देशमुख, रूपाली देशमुख, मनीषा देशमुख, विश्वतेज देशमुख, शिवतेज देशमुख, जयराज देशमुख, स्वराताई देशमुख यांच्यासह कुटुंबीयांनी स्व. देशमुख आण्णांना आदरांजली वाहिली.

स्व. संपतरावजी देशमुख यांनी सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून राजकारण व समाजकारण केले. दुष्काळी भागाला पाणी



मिळावे आणि निर्जीव जमिनीला जीवन मिळावे यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. 'मंत्रीपद नको, माझ्या भागाला पाणी द्या,' ही त्यांची भूमिका जनमानसात आजही स्मरणात आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांतून २० ऑक्टोबर १९९५ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते टेंभू उपसा जलसिंचन योजनेला मंजुरी मिळाली.

सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागांना जीवनदान देणारी ही योजना आज आशिया खंडातील सर्वात मोठ्या पाणी लिफ्ट योजनांपैकी एक मानली जाते. या योजनेमुळे ओसाड माळरान हिरवाईने नटले असून स्व. देशमुख आण्णांच्या विचारांचा वारसा देशमुख कुटुंबीय पुढे नेत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास माजी खासदार संजय पाटील, आमदार डॉ. अतुल भोसले, आमदार मनोज घोरपडे, माजी आमदार सदाशिव पाटील, चंद्रहार पाटील, प्रांताधिकारी रणजीत भोसले, तहसीलदार अजित शेलार, कडेगावचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख,

पंचायत समिती सदस्य पूनम माळी, भाजपा तालुकाध्यक्ष विकास सूर्यवंशी, शहराध्यक्ष संदीप गायकवाड, शिवसेना तालुकाध्यक्ष प्रदीप कदम यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्टोव्हक्राफ्ट लिमिटेडची आर्थिक वर्ष २०२६ मध्ये दमदार कामगिरी

**मुंबई : हॅलो प्रभात**

किचन आणि होम अप्लायन्सेस क्षेत्रातील आघाडीची कंपनी स्टोव्हक्राफ्ट लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये मजबूत आर्थिक वाढ नोंदवली आहे. इंडक्शन कुकिंग उपकरणांच्या वाढत्या मागणीमुळे कंपनीच्या महसूल आणि नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे.

कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १६०७.४२ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला असून त्यात १०.९ टक्क्यांची वाढ झाली आहे. चौथ्या तिमाहीत महसूल ४१४.५२ कोटी रुपयांवर पोहोचला असून, वार्षिक तुलनेत ३२.४ टक्क्यांची वाढ झाली आहे.

इंडक्शन कुकटॉप विभाग कंपनीसाठी सर्वात मोठा वाढीचा आधार ठरला. या श्रेणीत चौथ्या



तिमाहीत ८९.४ टक्के मूल्यवाढ झाली. ऊर्जा-कार्यक्षम आणि आधुनिक कुकिंग सोल्यूशन्सकडे ग्राहकांचा वाढता कल यामुळे मागणीत वाढ झाल्याचे कंपनीने म्हटले आहे.

आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कंपनीचा एबिटा १०.३ टक्क्यांनी वाढून १६६.१३ कोटी रुपयांवर पोहोचला, तर एबिटा मार्जिन १०.३ टक्क्यांवर स्थिर राहिले. कर पश्चात नफ्यातही वाढ झाली असून चौथ्या तिमाहीत त्यात ३१७.४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

## महिलांना शिलाई मशीन वाटप; ३,२२५ लाभार्थींना लाभ

**नातेपुते : हॅलो प्रभात**



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती आणि महाराष्ट्र दिनानिमित्त शिवसेनेचे राजकुमार हिवरकर-पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित 'उत्सव नारीशक्तीचा' शिलाई मशीन वाटप उपक्रमाचा समारोप झाला. १ मे ते १५ मे दरम्यान ३,२२५ महिलांना केवळ आधार कार्डच्या आधारे शिलाई मशीनचे वाटप करण्यात आल्याची माहिती हिवरकर-पाटील यांनी दिली. नातेपुते पोलीस ठाण्याच्या पीएसआय सोनल मोरे यांनी या उपक्रमामुळे महिलांना स्वावलंबी होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी रणजीत जठार, सुनील बनकर, मनोज जाधव, पोपटराव शिंदे, ररियाज शेख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## ॲबाक्कस म्युच्युअल फंडचा ५,००० कोटी एयूएमचा टप्पा पार

**पुणे : हॅलो प्रभात**

ॲबाक्कस म्युच्युअलफंडने व्यवस्थापनाखालील मालमत्तेत ५,००० कोटी रुपयांचा टप्पा पार केला असून, फंड हाऊसच्या युनिक गुंतवणूकदारांची संख्या १ लाखांच्या पुढे गेली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये पहिली योजना सुरू केल्यानंतर अवघ्या काही महिन्यांत कंपनीने ही कामगिरी नोंदवली आहे. ८ मे २०२६ पर्यंत ॲबाक्कस म्युच्युअल फंडचे एकूण एयूएम ५,४८२ कोटी रुपये झाले असून, देशातील २,००१ ठिकाणे आणि ९,५७३ पिनकोडमधील १,००,७०२ पेक्षा अधिक गुंतवणूकदार या फंडशी जोडले गेले आहेत.

## ॲमिटी ऑनलाइनची राष्ट्रीय स्तरावर विक्रमी शिष्यवृत्ती परीक्षा

**मुंबई : हॅलो प्रभात**

'ॲमिटी युनिव्हर्सिटी ऑनलाइन'तर्फे आयोजित 'ॲमिटी ऑनलाइन नॅशनल स्कॉलरशिप ॲप्टिट्यूड टेस्ट' २०२६ ची पहिली आवृत्ती यशस्वीरीत्या पार पडली. ऑनलाइन पदवी अभ्यासक्रमांसाठी घेण्यात आलेली ही भारतातील सर्वात मोठी ऑनलाइन शिष्यवृत्ती प्रवेश परीक्षा ठरल्याचा दावा संस्थेकडून करण्यात आला आहे.

या परीक्षेत अंदमान-निकोबार ते त्रिपुरा आणि लुधियाना ते कोचीपर्यंत देशभरातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. महानगरांसह टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील ४९५ हून अधिक शहरांतून नोंदणी झाली. हजारो विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण करत पुढील प्रवेश प्रक्रियेलाही सुरुवात केली आहे.

पदवी आणि पदव्युत्तर श्रेणीतील १२ गुणवंत विद्यार्थ्यांना गुणवत्ता-आधारित शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. ऑनलाइन उच्च शिक्षण अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि गुणवत्ता-केंद्रित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे विद्यापीठाने सांगितले.

हॅलो प्रभात नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय : स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१.(महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at S.No.14/15/2/3, Flat No.20, Shivpushpa, A Park, Vadgaon B. Pune- 411041 - Editor : Sanjeev Shalgaonkar

■ कोल्हापूर कार्यालय : गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२ ■ सांगली कार्यालय : कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ मुंबई कार्यालय : सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर ■ संपर्क : 8551055113

## गाळ काढण्याच्या निर्णयाने शेतकऱ्यांना दिलासा : प्राजक्त तनपुरे



**राहुरी : हॅलो प्रभात** : मुळा धरणातील वाढता गाळ, कमी होत चाललेली पाणीसाठा क्षमता आणि अनियंत्रित वाळू उपसा या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत जलाशयातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्याच्या सुधारित धोरणास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मानले जात आहे. या निर्णयानंतर माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी समाधान व्यक्त करत प्रतिक्रिया दिली. 'आमदारकी नको, पण लोकांची कामे झाली पाहिजेत,' अशी भूमिका घेत आपण पोटनिवडणुकीतून माघार घेतली होती. त्या वेळी केलेल्या मागण्यांपैकी एक महत्त्वाची मागणी आता पूर्ण होत असल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. या निर्णयामुळे मुळा धरणाची पाणीसाठा क्षमता वाढण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे हा गाळ शेतकऱ्यांना पूर्णपणे मोफत देण्यात येणार असून केवळ वाहतूक खर्च शेतकऱ्यांना करावा लागणार आहे. त्यामुळे जलसंधारणासोबतच शेतकऱ्यांच्या हितालाही चालना मिळणार असल्याचे बोलले जात आहे. या निर्णयाबद्दल तनपुरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस तसेच जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे आभार मानले आहेत.

# महावितरण उपकेंद्र बनले भंगाराचे आगार?

### वीजग्राहकांची लूटमार करण्याचा प्रयत्न :अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे ग्राहकांना संताप







**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

वीजग्राहकांची समस्या सोडविण्याऐवजी त्यांना चकरा मारण्यास भाग पाडणाऱ्या महावितरण अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित कारभारामुळे वाघोली येथील महावितरणचे असलेले उपकेंद्र हे भंगाराचे आगार बनल्याने येथील अधिकाऱ्याच्या मनमानी कारभाराने वीजग्राहक हैराण होऊन ग्राहकांची लूटमार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यास वरदहस्त कोणाचा?हा मुख्य प्रश्न वीजग्राहकांना सतावत आहे.

आज समाजातील नागरिकांना अन्न,वस्त्र,निवारा याबरोबरच विजेची आवश्यकता अधिक भासू लागल्यामुळे महावितरण विभागामार्फत शहरासह ग्रामीण भागात देखील उपकेंद्र उभारण्यात आल्याने वीजग्राहकांचे असलेले विजेचे मुख्य प्रश्न सुटण्यास मदत झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असले तरी पण अनेक उपकेंद्रातील अधिकाऱ्यांच्या दडपशाहीला नागरिकांना सामोरे जाण्याची वेळ येत असून सध्या वाघोली भागाची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन वाघोली _बकोरी मार्गावर महावितरण विभागाच्या वतीने ग्राहकांच्या सोयीनुसार उपकेंद्र उभारण्यात आले असले तरी पण येथील साहित्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा सुरक्षा रक्षक नेमण्यात न आल्याने येथे केंद्राच्या आवारात ठेवण्यात आलेल्या साहित्यांची चोरी झाल्यास यास जबाबदार कोण?हा मुख्य प्रश्न अनेकांना सतावत आहे.

याबरोबरच येथे येणाऱ्या वीजग्राहकांना कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याच्या उडवाउडवीच्या उत्तरांचा सामना करण्याची वेळ येऊन ज्या वीजग्राहकामुळे महावितरण विभागाचा सर्व कारभार चालत असेल व त्याच ग्राहकांना अशा अधिकाऱ्याकडून अपमानास्पद वागणूक मिळत असेल.तर सर्वसामान्य जनतेने भरोसा कोणावर ठेवायचा?हा मुख्य सवाल त्यांच्या वागणुकीमुळे उपस्थित होत आहे.तर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे विजेसाठी लागणारे विद्युत् पोल,तारा यासह महत्वाचे कागदी व विद्युत् बॉक्स हे गेल्या अनेक महिन्यापासून उघड्यावरच पडून अस्ताव्यस्त पडलेल्या अवस्थेत दिसून येत आहे.त्यामुळे या साहित्यांना वाली कोण?हा मुख्य सवाल उपस्थित होत असून मात्र मुख्य समस्येकडे लक्ष देण्यासाठी टाळाटाळ करणारे अधिकारी तेथे फिरण्याची थोडीही तसदी घेत नसल्याने एखाद्या दिवशी जर असलेले साहित्य चोरीस गेले तर यास जबाबदार कोण?राहणार असा संतप्त सवाल वीजग्राहकाकडून होत आहे.या सर्व कारभारामुळे अधिकाऱ्याचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

याबरोबरच संबंधित उपकेंद्र अंतर्गत वाघोलीसह केसनंद, बकोरि,आव्हाळवाडी आदी भागाचा या उपकेंद्रात समावेश करण्यात आला असताना येथे कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक वीजग्राहकास अधिकाऱ्याच्या उद्धटपणाचा सामना करण्याची वेळ येत असून येथील अधिकारी हे ग्राहकांच्या समस्येकडे पाठ फिरवून त्यांना केराची टोपली दाखवत आहे. त्यामुळे अनेक ग्राहकांना त्यांच्याकडून होणारा मनस्ताप निमूटपणे सहन करण्याची वेळ येत आहे.

यासंदर्भात वीजमीटर बसविण्यासाठी गेल्या अनेक दिवसापासून चकरा मारत असलेला ग्राहक हा पुन्हा येथे कार्यरत असलेले भगवान विधाते या अधिकाऱ्यांची भेट घेण्यास गेले असता ते रजेवर असल्याची माहिती समोर आली आहे.तर हडपसर उपविभागाचे अधिकारी निलेश रासकर यांच्याशी फोनवर संपर्क केला असता त्यांनी देखील रजेवर असल्याचे सांगितले. त्यामुळे येथे एका ग्राहकास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असेल तर रोज येणाऱ्या ग्राहकांना किती चकरा माराव्या लागत असतील हे सांगणे सध्या तरी कठीण आहे.

**शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता अनेकांनी आपला मोर्चा ग्रामीण भागाकडे वळून या भागातील अनेक ठिकाणी टोलेजंग इमारतींचे बांधकाम सुरू आहे. मात्र असलेल्या बांधकाम ठिकाणी सर्रासपणे वीजेची चोरी होत असताना अशा वीजचोरावर कारवाई करण्याऐवजी असलेले अधिकारी हे बघ्याची भूमिका घेत आहे.त्यामुळे अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळे वीजेची चोरी होते का?हा सवाल उपस्थित होऊन मागील वर्षी केसनंद येथील बांगर वस्ती येथे एका बांधकामाच्या ठिकाणी होत असलेली वीजेची चोरी संबंधित वीजग्राहकाने उघडकीस आणून दिली असताना देखील त्याच ग्राहकास जुना वीज मीटर बसविण्यासाठी चकरा मारण्याची वेळ येत आहे.त्यामुळे यासारखी दुसरी कोणती शोकांतिका असू शकते हे सांगणे कठीण आहे.**

### जादा रकमेची पावती कोणत्या नियमानुसार

**बंद असलेल्या वीजमीटर बसविण्यासाठी असलेली थकबाकी भरण्यास ग्राहक तयार आहे.मात्र वीजमीटर जर तुम्हाला पुन्हा बसवायचा असेल तर तुम्हाला प्रथम प्रत्येकी दोन हजार रुपयांच्या दोन पावत्या आपण केल्यावरच आपला वीजमीटर बसविण्यात येईल.असा चक्क सल्ला येथे कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याकडून मिळाल्याने त्यांचे हे बोल ऐकून ग्राहक चक्रावून तर गेलेच पण कोणत्या नियमाच्या आधारे ह्या दोन पावत्या करायच्या ह्या संभ्रमात आलेले वीजग्राहक पडले आहेत.त्यामुळे पावतीच्या नावाखाली वीजग्राहकांची पिळवणूक व ग्राहकांची लूटमार करणाऱ्या अधिकाऱ्यावर वरिष्ठ पातळीवर अधिकारी कारवाईची काय?भूमिका घेणार याकडे वीजग्राहकांचे लक्ष वेधून राहिले आहे.तर पावतीच्या नावाखाली येथील कार्यालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची शंका उपस्थित केली जात आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### आर्थिक फसवणूक प्रकरणी आरोपीला अटक; चंदननगर पोलिसांची कारवाई

**पुणे : हॅलो प्रभात**

मित्राचा विश्वास संपादन करून रोख रक्कम व सोन्याचे गंठण गहाण ठेवून आर्थिक फसवणूक करून फरार झालेल्या आरोपीस चंदननगर पोलीस ठाणे पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. अटक आरोपीचे नाव दत्तात्रय बबन तावरे (वय ३६, रा. कोल्हेवाडी, रेठरे बुद्रुक, ता. कराड, जि. सातारा) असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीकडून सुरुवातीला पोल्ट्री फार्मसाठी ५० हजार रुपये उसने घेतले. त्यानंतर नातेवाईकांच्या लग्नाचे कारण सांगून सोन्याचे गंठण घेतले व ते गहाण ठेवून सुमारे सव्वा लाख रुपये उचलून फरार झाला. फिर्यादीच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक महेश लामखेडे, गणेश जमदाडे, किरण घुटे व विक्रम गायकवाड यांच्या पथकाने तपास करून आरोपीला अटक केली. आरोपीकडून अधिक तपासासाठी त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या कारवाईचे शहरभर कौतुक होत आहे.

### भक्तांच्या श्रद्धेला मानाचा मुकुट

**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती संस्थानाला 'अ' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे तीर्थक्षेत्र आणि पर्यटन क्षेत्रात सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल माध्यम प्लॅटफॉर्म X वरून ही महत्त्वाची घोषणा केली.



कीर्तनातून इंदुरीकर यांचे आवाहन

## नोकरीच्या नादी न लागता स्वतःचा व्यवसाय करा

**पारनेर : हॅलो प्रभात**

आजच्या धावपळीच्या युगात तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय करून स्वावलंबी बनावे. कष्टाने मिळवलेला पैसाच जीवनात चिरकाळ टिकतो, असे परखड मत प्रसिद्ध समाज प्रबोधनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांनी व्यक्त केले. वासुंदे येथील खडक वस्ती येथे उद्योजक पप्पू दाते व गणेश दाते या बंधूंनी आपल्या घरगुती कार्यक्रमानिमित्त इंदुरीकर महाराजांच्या कीर्तन सेवेचे आयोजन केले होते. शनिवार, दिनांक ९ मे २०२६ रोजी झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित अफाट जनसमुदायाला मार्गदर्शन करताना महाराज बोलत होते. कीर्तनाद्वारे समाजातील वास्तव मांडताना इंदुरीकर महाराज म्हणाले की, जीवनात चांगल्या मित्रांची संगत करणे अत्यंत आवश्यक आहे. शरीर संपदा हीच खरी संपत्ती असून ती कमावण्यासाठी आणि टिकवण्यासाठी तरुणांनी प्रयत्न केले पाहिजेत. आजची तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आणि तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनांपासून दूर राहावे, असे कळकळीचे आवाहन केले. महाराजांनी पालकांना मोलाचा सल्ला दिला की, प्रत्येकाने आपल्या घरात संस्कारी मुले तयार करावीत. केवळ भौतिक प्रगती महत्त्वाची नसून, मुलांवर होणारे संस्कार हेच कुटुंबाचे आणि राष्ट्राचे भविष्य उज्ज्वल करतात. मानवी जीवनाचे सार्थक करण्यासाठी 'धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष' या चार पुरुषार्थांचा अंगीकार प्रत्येकाने केला पाहिजे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करतानाच भगवंताची सेवा करून आपले जीवन मंगलमय बनवण्याचा मार्ग त्यांनी भाविकांना दाखवला. दाते परिवाराने आपल्या घरगुती कार्यक्रमात अनावश्यक डामडौल करण्याऐवजी समाज प्रबोधनपर कीर्तनाचे आयोजन करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. दाते परिवार हा डॉ. नारायण महाराज जाधव यांना आपला आदर्श मानतो, तर निवृत्ती महाराज इंदुरीकर यांना आपला मार्गदर्शक मानून वाटचाल करत आहे. दाते परिवाराने या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला.

**या कीर्तन सोहळ्यासाठी टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ, खडकवाडी आणि परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दाते परिवाराने आयोजित केलेल्या या 'भक्ती आणि प्रबोधन' सोहळ्याचे परिसरात मोठे कौतुक होत आहे.**

## तीन दिवसांत अकरा गड-किल्ले सर

### 'गँग ऑफ ट्रेकर्स'ची उन्हाळी मोहीम यशस्वी

**पुणे : हॅलो प्रभात**

भर उन्हाळ्यात सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये अवघ्या तीन दिवसांत तब्बल ११ गड-किल्ले सर करून 'गँग ऑफ ट्रेकर्स, पुणे'च्या सात ट्रेकर्सनी साहस, नियोजन आणि शारीरिक तंदुरुस्तीचा अनोखा आदर्श निर्माण केला. १० ते १२ मे दरम्यान पार पडलेल्या या "उन्हाळी मॅरेथॉन ट्रेक मोहिमे"त सुमारे ८५० किलोमीटरचा कार प्रवास करत सातारा व सांगली जिल्ह्यातील विविध गड-किल्ल्यांची यशस्वी भटकंती करण्यात आली.



मोहिमेच्या पहिल्या दिवशी ट्रेकर्सनी पाटण तालुक्यातील दातेगड उर्फ सुंदरगड, गुणवंतगड आणि कराडजवळील तळबीड येथील वसंतगड सर केला. दुसऱ्या दिवशी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील विलासगड, मच्छिंद्रगड तसेच कराड तालुक्यातील हजरमाची येथील सदाशिवगड यांसह बहादुरवाडी आणि बागणी हे प्राचीन भुईकोट किल्ले सर करण्यात आले. तिसऱ्या दिवशी सातारा जिल्ह्यातील पाटेश्वर डोंगर, अजिंक्यतारा आणि सज्जनगड सर करून मोहिमेची यशस्वी सांगता झाली. या मोहिमेत पुण्यातील विद्यार्थिनी आद्या बीजगर्णी, आराध्या चौथमल, श्रुती गोसावी, कीर्ती बीजगर्णी आणि सृष्टी खेत्री यांनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच नूतन महिला विकास शिक्षण मंडळ, कासेगावचे सेक्रेटरी विश्राम कुलकर्णी आणि ग्रुप लीडर ॲड. सम्राट रावते यांनीही मोहिमेत सहभाग घेतला.

ग्रुप लीडर ॲड. सम्राट रावते यांनी सांगितले की, योग्य नियोजन, पुरेशी तयारी आणि शारीरिक क्षमता असल्यास भर उन्हाळ्यातही गड-किल्ले सुरक्षितपणे सर करता येतात. उन्हाळ्यात ट्रेकिंग केल्याने गडांवरील वास्तू, पायवाटा आणि परिसर स्पष्ट दिसतो, गर्दी कमी असते तसेच शारीरिक क्षमतेची खरी परीक्षा होते. शिवाय गडांच्या पायथ्याशी असलेल्या गावांचे जीवनमान जवळून अनुभवता येते, असे मत व्यक्त केले.

दरम्यान, याच उन्हाळ्यात गटाने गोरखगड, मोरोशीचा भैरवगड, श्री मंगलगड आणि रामशेज किल्लाही सर केला आहे. विविध जिल्ह्यांतील गड-किल्ल्यांवर मॅरेथॉन पद्धतीने ट्रेक मोहीम राबविण्याचे हे 'गँग ऑफ ट्रेकर्स'चे सलग दुसरे वर्ष ठरले आहे.

# कोयता गँगची दहशत मोडणारे : नंदकुमार गायकवाड

### दबंग स्टाईलने गुन्हेगारांवर केला दरारा

**पुणे : हॅलो प्रभात**

दबंग स्टाईलने गुन्हेगारांवर दरारा निर्माण करणारे वाघोली पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी पोलिस स्टेशन हद्दीत तीन महिन्यापूर्वी कारभार सांभाळताच आपली वाघोली परिसरात कारवाईची छाप पाडून कोयता गँगची दहशत मोडीत काढणारे पोलीस निरीक्षक म्हणून वाघोली परिसरात ते ओळखले जात असून गुन्हेगारांवर त्यांनी वचक निर्माण केला आहे. सध्या पूर्व हवेली तालुक्यातील वाघोली परिसराचा चार ते साडेचार वर्षापूर्वी समावेश करण्यात आला असला तरी पण यापूर्वी परिसरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधित राहण्यासाठी शहर पोलिस आयुक्तालय अंतर्गत प्रथम परिसराचा लोणीकंद पोलिस स्टेशनमध्ये समावेश करून वाघोली परिसरातील केसनंद फाटा येथे तात्पुरत्या स्वरूपात पोलिस चौकी उभारण्यात आली होती.मात्र चौकीत पोलिस यंत्रणेचे कमी असलेल्या संख्याबळामुळे वाघोलीसह केसनंद,आव्हाळवाडी,लोहगाव रोड आदी भागात अवैध धंद्यासह गुन्हेगारांनी डोके वर काढल्यामुळे परिसरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर येऊन रात्रीच्या सुमारास महिलांनी घराबाहेर पडण्याची धास्ती घेतली होती.



मात्र परिसरातील अवैध धंद्यासह गुन्हेगारीने डोके वर काढलेल्या गुन्हेगारीला आळा बसावा,या उद्देशाने पुणे शहर पोलिस आयुक्त कार्यालयाच्या वतीने अडीच ते पावणेतीन वर्षापूर्वी नव्याने परिसरात वाघोली पोलिस स्टेशनची उभारणी करून देखील संबंधित पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्याचे जाळे पसरून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर येऊन येथील गुन्हेगारी रोखणे हे पोलिसांच्या समोर आव्हान होते. त्यातच राज्यात सध्या महिलांसह अल्पवयीन मुलीवर वाढणारे अत्याचार रोखण्यासाठी येथील असलेल्या पोलिस स्टेशनला दबंग अथवा सिंगमसारख्या कर्तव्यदक्ष वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याची गरज असल्याचे पोलिस आयुक्तांच्या लक्षात येताच येरवडा येथील लक्ष्मीनगर पोलिस स्टेशन या ठिकाणी सिंघम म्हणून ओळखले जाणारे रविंद्र कदम यांच्यापाठोपाठ वाघोली पोलिस स्टेशनमध्ये पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनादखाली नंदकुमार गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली.

ज्यावेळेस गायकवाड यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षकाचा कार्यभार हातात घेऊन महिना उलटत नाही तोच त्यांच्या कार्यकाळात एक ते दिड महिन्यापूर्वी एका खाजगी कॉलेजकडे जाणाऱ्या मार्गावर वाघोली परिसरात दहशत पसरविण्याचा उद्देशाने कोयता गँगने डोके वर काढून एकावर धारदार कोयत्याने हल्ला करून संबंधित युवकास गंभीर जखमी केले होते.यामुळे शहरापाठोपाठ कोयता गँगची चर्चा परिसरात पसरली होती.मात्र झालेल्या गंभीर घटनेची गायकवाड यांनी दखल घेत तपास पथकाच्या वतीने संबंधित गुन्हेगारांना अटक करण्यात यश आल्यावर एवढ्यावर नंदकुमार गायकवाड हे न थांबता सर्वसामान्यांचे सहारा बनलेले गायकवाड यांनी गुन्हेगारांवर कायद्याचा दरारा निर्माण होण्याचे उद्देशाने संबंधित आरोपींची वाघोली परिसरातून धिंड काढून पोलिस यंत्रणा ही गुन्हेगारांचे कर्दनकाळ असल्याचे दाखवून दिल्याने त्यांनी पोलिस स्टेशन हद्दीत गुन्हेगारांवर वचक निर्माण करून दरारा निर्माण केल्याने विशेष करून महिलांनी मोकळा श्वास सोडून समाधान व्यक्त केले आहे.

प्रथमच त्यांनी गुन्हेगारांवर धडक मोहीम हाती घेतल्याने गुन्हेगारांनी त्यांच्या नावाचा एक प्रकारे धसका घेतला असल्याचे सध्या परिसरात कमी झालेल्या गुन्हेगारीमुळे सिद्ध होत आहे.हे कार्य बजावत असताना त्यांनी समाजातील सर्वसामान्य जनतेला खाकी वर्दीतील अधिकारीच नव्हे तर एक माणूस म्हणून जनतेसमोर एक आदर्श निर्माण केल्याने नागरिकांमध्ये देखील त्यांच्या विषयी आपुलकी निर्माण होऊन आज समाजातील अनेक महिलांना चूल आणि मूल या चार भिंतीच्या पलीकडे काय?सुरू आहे.याची पुसटशी कल्पना नसल्याने आजच्या युगात देखील अनेक महिला ह्या सासरी होणाऱ्या छळ व अत्याचार या घटनांना बळी पडत आहे.त्यामुळे समाजातील अशा महिलांमध्ये गायकवाड हे जनजागृती करून त्यांना मायेचा आधार देऊन ते कोणाचे काका तर कोणाचे मामा बनण्याची भूमिका पार पडत आहे.त्यामुळे समाजातील अनेक महिला ह्या होणाऱ्या अत्याचाराविरोधात न्याय मिळविण्यासाठी पोलिस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांच्याकडे धाव घेऊन आपल्या व्यथा मांडत आहे.त्यामुळे गायकवाड हे देखील होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवून अनेक महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे

तर सध्याच्या युगात अनेक तरुण हे व्यसनाच्या आहारी जाऊन व्यसनाधीन झाल्याने असे तरुण व्यसनाधीन होऊ नये.याकरिता हे अधिकारी तरुणांमध्ये जनजागृती करून प्रबोधन करण्याचे काम करत आहे.त्यामुळे अनेक तरुण यातून मुक्त होऊन रोजगार उपलब्ध करून स्वतःच्या पायावर उभे राहिले आहे.त्यामुळे संबंधित अधिकारी हे युवकांच्या गळ्यातील ताईत बनले असून भविष्यात वाघोली परिसर अवैध धंदे व गुन्हेगारीतून मुक्त होण्यासाठी ते करत असलेले कार्य हे शब्दात सांगितले तरी कमीच आहे.त्यामुळे आपल्या कार्यात राबवित असलेली धडक मोहीमची कारवाई ही तरुण वर्गांना प्रेरणा देणारी आहे.त्यामुळे तरुणांनी देखील त्यांचा आदेश डोळ्यासमोर ठेवून सामाजिक कार्य करण्यावर भर दिला आहे.त्यामुळे त्यांचे सुरू असलेले कार्य हे लाखमोलाचे असल्याचे सर्वसामान्य जनतेत बोलले जात आहे.

# साखराळे युनिटचे आधुनिकीकरण अंतिम टप्प्यात

## प्रतिक पाटील ; यंदा १०,५०० मेट्रीक टन गाळप क्षमता

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना यांच्या साखराळे युनिटच्या आधुनिकीकरणाचे काम वेगाने सुरू असून येत्या ३० ऑगस्टपर्यंत ते पूर्ण करण्यात येणार आहे. आगामी गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये साखराळे युनिटमध्ये प्रतिदिन १० हजार ५०० मेट्रीक टन क्षमतेने ऊस गाळप करण्यात येईल, असा विश्वास कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांनी व्यक्त केला. साखराळे युनिटच्या गळीत हंगाम २०२६-२७ च्या मिल रोलर पूजन कार्यक्रमावेळी ते बोलत होते. प्रारंभी प्रभारी कार्यकारी संचालक विजय मधुकर मोरे यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले.

यावेळी संचालक बाळासाहेब पवार, प्रदीपकुमार पाटील, कार्तिक पाटील, अतुल पाटील, विठ्ठल पाटील, शैलेश पाटील, प्रताप पाटील, दादासाहेब मोरे, अमरसिंह साळुंखे, रमेश हाके, रघुनाथ जाधव, राजकुमार कांबळे, दिलीपराव देसाई, प्रा. डॉ. योजना शिंदे-पाटील, दीपक पाटील, रामराव पाटील, वैभव रकटे आदी उपस्थित होते.



प्रतिक पाटील पुढे म्हणाले की, साखराळे युनिटमध्ये यापूर्वी प्रतिदिन सात हजार मेट्रीक टन उसाचे गाळप केले जात होते. मात्र, यंदा आधुनिकीकरणाची कामे पूर्ण होत असल्याने गाळप क्षमता वाढवून १० हजार ५०० मेट्रीक टन करण्यात येत आहे. आगामी गळीत हंगामासाठी कारखान्याच्या चारही युनिटमध्ये पुरेशा उसाची नोंद झाली असून सक्षम ऊसतोडणी व वाहतूक यंत्रणा उभी करण्यात आली आहे. साखराळे युनिटसाठी ४०० ट्रॅक्टर, ४०० अंगद, ६०० बैलगाड्या तसेच २० ऊसतोडणी मशीनचे करार पूर्ण झाले असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रारंभी प्रभारी कार्यकारी संचालक विजय मधुकर मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील यांनी आभार मानले. यावेळी सचिव डी. एम. पाटील, संदीप पाटील, प्रेमनाथ कमलाकर, उमेश सुतार, धैर्यशील पाटील, जे. बी. पाटील, धनाजी लाड, संभाजी खोत, डॉ. प्रकाश म्हाळुंगकर, राजेंद्र पाटील, सुनिल जाधव, संजय गुरव, मुकेश करळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'आदर्श इंग्लिश मीडियम'चा दहावीला शंभर टक्के निकाल

पेठवडगाव : हॅलो प्रभात

सावर्डे (ता.हातकणंगले) येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलने दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यंदाच्या निकालात आर्या चव्हाण हिने ९६.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. आदिती जाधव हिने ९४.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर करण लुगडे याने ९४.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. गुणवंत विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि नियमित अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता आणि उज्ज्वल परंपरा अबाधित राखली. विद्यार्थ्यांच्या यशामागे संस्थेचे अध्यक्ष बजरंग लुगडे यांचे मार्गदर्शन तसेच मुख्याध्यापिका सौ. शीतल लुगडे आणि सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह शिक्षक व पालकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आकाशवाणी रत्नागिरी केंद्रांतर्फे सुगम संगीत मैफिलीचे आयोजन

रत्नागिरी : हॅलो प्रभात

आकाशवाणीच्या गौरवशाली प्रसारणाच्या ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त आकाशवाणी रत्नागिरी केंद्र तर्फे सुगम संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही मैफिल बुधवार, २० मे रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात होणार असल्याची माहिती कार्यालय प्रमुख अधीर गढपाले व कार्यक्रम प्रमुख डॉ. सुनील गायकवाड यांनी दिली. या निमित्ताने महाराष्ट्रभर विविध सांस्कृतिक व संगीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून रत्नागिरी केंद्रानेही त्यात सहभाग घेतला आहे. या मैफिलीत गायिका वैदेही करंबेळकर व गायक अभिजीत नांदगावकर सुमधुर सुगम गीते सादर करणार आहेत. त्यांना महेश दामले (हार्मोनियम), राजू किल्लेकर (सिंथेसायझर), उदय गोखले (व्हायोलीन) आणि प्रथमेश देवधर (तबला) साथसंगत करणार आहेत.कार्यक्रमाचे निवेदन ज्येष्ठ निवेदिका निशा काळे व कश्मीरा सावंत करणार आहेत. ध्वनीव्यवस्था उदयराज सावंत यांची असून संपूर्ण नियोजन विवेक वानखडे यांनी केले आहे. रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य असून रत्नागिरीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महायुती आली आणि पेठ-सांगली रस्ता पूर्ण झाला : शुभम पाटील

ईश्वरपूर : हॅलो प्रभात



पेठ-सांगली रस्त्याच्या कामावरून राजकीय वातावरण तापले असून पंचायत समिती सदस्य शुभम पाटील यांनी विरोधकांवर जोरदार टीका करत "३० वर्षे रखडलेला रस्ता महायुती सरकारच्या काळात पूर्ण झाला" असा दावा केला आहे. त्यांनी सांगितले की, गेली अनेक दशके सत्ता उपभोगूनही हा रस्ता पूर्ण करण्यात अपयश आले, मात्र २०१४ नंतर भाजप व महायुती सरकारच्या काळात कामाला गती मिळाली.

शुभम पाटील यांनी सांगितले की, तत्कालीन पालकमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने हा रस्ता मार्गी लागला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून प्रकल्पाला गती मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, विरोधकांकडून विकासकामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जात असून जनतेची दिशाभूल केली जात आहे. रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्गात वर्ग होणे तसेच 'हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल' अंतर्गत निधी मंजूर होणे हे महायुती सरकारच्या काळातील निर्णय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्हा सरचिटणीस डॉ. सचिन पाटील, आष्टा मंडल अध्यक्ष अमोल पडळकर, ईश्वरपूर मंडल अध्यक्ष संदीपराज पवार व वाळवा ग्रामीण मंडल अध्यक्ष अर्जुन साळुंखे उपस्थित होते. सचिन पाटील यांनीही विरोधकांवर टीका करत विकासकामांबाबत खोटा प्रचार केला जात असल्याचा आरोप केला. शक्तीपीठ महामार्गावरूनही राजकीय मतभेद तीव्र झाले असून महायुती सरकार पायाभूत विकासासाठी कटिबद्ध असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# जैन मंदिर समोर बांधलेल्या भक्तनिवासचे लोकार्पण

रुकडी : हॅलो प्रभात

साजणी येथे जैन मंदिरासमोरील नव्याने बांधलेल्या भक्तनिवास वास्तूचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कार्यसम्राट आमदार डॉ. राहुल आवाडे यांनी सहस्रफणी भगवान पार्श्वनाथांच्या दर्शनासाठी देशभरातून येणाऱ्या जैन भक्त व मुनिंसाठी लवकरच मुनि निवास उभारण्यात येईल, अशी घोषणा केली. साजणी गावच्या विकासासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.माजी मंत्री प्रकाश



आवाडे यांनी सहस्रफणी भगवान पार्श्वनाथांची मूर्ती अतिशय प्रभावी असल्याचे सांगत, मूर्तीच्या दर्शनाने वेगळी अनुभूती मिळत असल्याचे नमूद केले. तसेच मुनि निवासासह ग्रामदैवत हनुमान मंदिराशेजारी जागा उपलब्ध झाल्यास सांस्कृतिक हॉल उभारण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी नांदणी मठ व साजणी अतिशय क्षेत्राचे ऐतिहासिक नाते अधोरेखित केले. कार्यक्रमात बालाचार्य तत्त्वार्थानंदी महाराज यांनी आर्ष परंपरा जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दुपारी सहस्रफणी पार्श्वनाथ मूर्तीचा पंचामृत अभिषेक तर सायंकाळी सवाद्य मिरवणुकीने रथोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

# कवठेमहांकाळ येथे 'समर्पण दिवस' भावपूर्ण वातावरणात साजरा

कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात

संत निरंकारी मिशनतर्फे युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'समर्पण दिवस' विविध आध्यात्मिक कार्यक्रमांनी भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्मिक चेतनेने भारलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते.

समालखा येथील संत निरंकारी आध्यात्मिक स्थळी आयोजित संत समागमात परम आदरणीय माता सुदीक्षाजी महाराज तसेच निरंकारी राजपिता रमितजी यांच्या सान्निध्यात देश-विदेशातील लाखो श्रद्धाळूंनी सहभाग घेतला. आपल्या आशीर्वचनांत माता सुदीक्षाजी महाराज यांनी बाबा हरदेवसिंहजी यांचे जीवन मानवता, सेवा आणि प्रेमभावनेचे जिवंत उदाहरण असल्याचे सांगितले. प्रत्येकाने निराकाराच्या आधाराने उद्देशपूर्ण जीवन जगत मानवतेचा संदेश समाजात पोहोचवावा,



असे आवाहन त्यांनी केले.

सांगली सेक्टर अंतर्गत कवठेमहांकाळ शाखेत झालेल्या सत्संग सोहळ्यात मिशनचे ब्रह्मज्ञान प्रचारक नवनाथ शेलार यांनी समर्पित जीवनाची प्रेरणा दिली. रक्तदान ही मानवतेसाठी अनमोल देण असल्याचे त्यांनी नमूद केले. या समागमात गीतकार, कवी आणि विचारवंतांनी आपल्या रचनांमधून बाबाजींच्या शिकवणींना अभिवादन केले. सांगली, मिरज, जत, नरवाड, सलगरे, देशिंग व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिराळा मतदारसंघातील विकासकामांना गती देणार : शिवाजीराव नाईक

शिराळा : हॅलो प्रभात

महाराष्ट्र राज्यातील सर्वसामान्य जनतेचे मोठे नेते अजित पवार यांच्या निधनाने राज्याचे मोठे नुकसान झाले असून त्यांच्या पश्चात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विकासकामांना गती देत लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक यांनी केले.

नेर्ले (ता. वाळवा) येथे शिराळा



विधानसभा मतदारसंघातील वाळवा तालुक्यातील ४८ गावातील प्रमुख कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना नाईक म्हणाले की, शिराळा मतदारसंघातील अपूर्ण विकासकामे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पाठपुरावा करून पूर्ण केली जातील.

यावेळी माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक, यशवंत ग्लुकोज कारखान्याचे उपाध्यक्ष शहाजी पाटील, इस्लामपूर मार्केट कमिटीचे संचालक सी. एच. पाटील तसेच तालुका अध्यक्ष केदार पाटील उपस्थित होते. वाकुर्डे बुद्रुक योजनेचे काम पूर्णत्वाकडे गेले असून लवकरच लाभक्षेत्रातील गावांना पाणी मिळणार असल्याचेही नाईक यांनी सांगितले.

यावेळी रणधीर नाईक यांनीही कार्यकर्त्यांच्या संघटित ताकदीमुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे यश मिळाल्याचे सांगत आगामी काळात विकासकामे वेगाने मार्गी लावली जातील, असे नमूद केले. मेळाव्यास ४८ गावांतील मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# बाळूमामा भंडारा उत्सवात भाविकांची मोठी गर्दी

शिराळा : हॅलो प्रभात

शिरशी (ता.शिराळा) येथे श्री विठ्ठल बिरदेव व सद्गुरू संत बाळूमामा भंडारा उत्सव पर्व दुसरा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. या कार्यक्रमास जिल्हा परिषद माजी सदस्य रणधीर नाईक यांनी सदिच्छा भेट देत भाविकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना रणधीर नाईक म्हणाले की, संत बाळूमामा



हे महाराष्ट्रातील महान संत असून त्यांना लोक देवाचा अवतार मानतात. त्यांनी आपले संपूर्ण जीवन दीन-दुबळ्यांच्या सेवेसाठी आणि समाजकल्याणासाठी समर्पित केले. त्यामुळे त्यांच्या भक्तांची संख्या राज्यभर मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्या सौ. राजेश्वरी नाईक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. श्री कृष्णात डोणे महाराज व कृष्णात पडवळे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शिरशी व परिसरातील तसेच विविध भागातून आलेल्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भंडारा उत्सवात सहभाग घेतला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

# एनआयटीमध्ये सिव्हिल पदवीसह एआय व कम्प्युटरचा शाखाविस्तार



कोल्हापूर : हॅलो प्रभात

दक्षिण महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण क्षेत्रात गेली ४३ वर्षे उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या न्यू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कोल्हापूर संस्थेने यंदा शाखाविस्तारासह मोठी शैक्षणिक झेप घेतली आहे. डिप्लोमा विभागातील एआयएमएल शाखेची प्रवेश क्षमता १२० वरून १५०, तर इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड कम्प्युटर शाखेची क्षमता ६० वरून ९० करण्यात आली आहे. याशिवाय, डिग्री विभागात ६० जागांसह सिव्हिल इंजिनिअरिंग ही पाचवी नवीन शाखा सुरू करण्यात येत आहे.

या सर्व अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून अंतिम मान्यता मिळाल्याची माहिती प्राचार्य डॉ. संजय दाभोळे यांनी दिली. एआय तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे एआयएमएल अभियंत्यांना मोठी मागणी असून इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड कम्प्युटर शाखा उद्योगांसाठी उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील वेगवान पायाभूत विकासामुळे सिव्हिल इंजिनिअर्सची गरजही वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी एनबीए मानांकन व संशोधनाला मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे भविष्यात अधिक स्टार्टअप निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी सई खराडे, सविता पाटील, पी. सी. पाटील व सेक्रेटरी मेटील उपस्थित होते.

# 'मध्यवर्ती'हातमाग विणकर संघाची निवडणूक बिनविरोध

## ▶▶ चेअरमनदी प्रकाश दत्तवाडे तर व्हा.चेअरमनपदी निवृत्ती गलगले

इचलकरंजी : हॅलो प्रभात

येथील मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकर संघ या संस्थेची सन २०२६-२०३१ या सालची संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडली. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग सोलापूर उज्वला पळसकर यांनी निवडणूक बिनविरोध झाल्याची घोषणा केली. त्यांच्याच अध्यक्षतेखाली झालेल्या नुतन संचालक मंडळाच्या बैठकीत संस्थेच्या चेअरमनपदी प्रकाश ज्ञानबा दत्तवाडे आणि व्हाईस चेअरमनपदी निवृत्ती कृष्णाजी गलगले यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.



प्रकाश दत्तवाडे



निवृत्ती गलगले

शतक महोत्सवाकडे वाटचाल सुरु असलेल्या मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकर संघ या संस्थेने सातत्याने पारंपारिक हातमाग व्यवसायाला चालना देण्याचे काम केले आहे. माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विणकरांच्या विश्वासाचे केंद्र बनली आहे. हातमाग संस्कृती जपण्याचे कार्य केले आहे. या संस्थेच्या पंचवार्षिक निवडणूकीसाठी १३ जागांसाठी तितकेच अर्ज आल्याने संस्थेची निवडणूक बिनविरोध जाहीर करण्यात आली. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून श्री. नरुटे यांनी काम पाहिले. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग सोलापूर उज्वला पळसकर यांच्या अध्यक्षतेखाली नुतन संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये सर्वानुमते चेअरमनपदी प्रकाश दत्तवाडे आणि व्हाईस चेअरमनपदी निवृत्ती गलगले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

# आर.आय.टी.च्या ३३ विद्यार्थ्यांची भारत फोर्जमध्ये निवड

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आर. आय. टी.) येथील विद्यार्थ्यांनी प्लेसमेंटमध्ये पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन करत देशातील अग्रगण्य भारत फोर्ज कंपनीत तब्बल ३३ विद्यार्थ्यांची निवड मिळवली आहे. यामध्ये अभियांत्रिकी विभागातील १६ तर डिप्लोमा विभागातील १७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.


अभियांत्रिकी विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये



इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील ७, मेकॅट्रॉनिक्स विभागातील ४ आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील ५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

जागतिक स्तरावर अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल घटक निर्मिती, औद्योगिक तंत्रज्ञान आणि फोर्जिंग क्षेत्रात आघाडीवर असलेल्या भारत फोर्जमध्ये निवड होणे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची संधी मानली जात आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा. एम. एन. मुल्ला यांनी सातत्यपूर्ण प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य विकास, मॉक इंटरव्ह्यू, ॲप्टिट्यूड तयारी आणि उद्योगाभिमुख मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. डिप्लोमा विभागाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अमेय गौरवाडकर यांनी डिप्लोमा विभागात दरवर्षी जवळपास शंभर टक्के प्लेसमेंटचा विक्रम कायम असल्याचे नमूद केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. व्ही. कडोले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला.

# डीकेटीईच्या विद्यार्थ्यांची बूटकॅम्पमध्ये चमकदार कामगिरी



इचलकरंजी : हॅलो प्रभात

डीकेटीई टेक्स्टाईल अ‍ॅन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट येथील इटीसी विभागातील विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या 'डिजिटल ड्रायव्हिंग टेस्ट सिस्टीम फॉर आरटीओ' या अभिनव प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. गुरुग्राम (हरियाणा) येथील श्री गुरु गोबिंद सिंग ट्रायसेंटेनरी विद्यापीठ येथे आयोजित इनोव्हेशन, डिझाईन ॲण्ड इंटरप्रेनरशिप बूटकॅम्पमध्ये या प्रकल्पाचे विशेष कौतुक करण्यात आले. विद्यार्थी आदित्य चंदगडे, प्रथमेश मांगलेकर, गिरीश अडते व सौरभ आवळे यांनी डॉ. एस. आर. प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प विकसित केला आहे. एआयसीटीई आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलतर्फे आयोजित या बूटकॅम्पमध्ये देशभरातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. आरटीओमधील वाहन चालविण्याच्या चाचणी प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप, पक्षपात व त्रुटी कमी करण्यासाठी ही सेन्सर आधारित स्वयंचलित प्रणाली तयार करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे वाहनचालकांच्या चाचणीचे अचूक व पारदर्शक मूल्यमापन केले जाते. बाउंड्री व्हायलेशन व फूट डाउनसारख्या चुका तत्काळ ओळखून निकाल सुरक्षितरीत्या क्लाऊडवर संग्रहित केला जातो. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे तसेच मानद सचिव डॉ. सपना आवाडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पुढील वर्षापासून ‘पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा’ राज्यव्यापी

## प्रथम पुरस्कार दिवंगत अजित पवार यांच्या नावाने देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव




**पुणे : हॅलो प्रभात**

शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुढील वर्षापासून ‘पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा’ राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या ‘पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा-२०२६’च्या समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर , हेमंत रासने,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाचा कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यामागे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष योगदान आहे. यंदाच्या स्पर्धेसाठी तब्बल १ हजार २९० अर्ज प्राप्त झाले असून विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या वर्षीच्या स्पर्धेतील चार संशोधन प्रकल्पांचे उत्पादन प्रत्यक्षात सुरू झाले असून आणखी १२ उत्पादने लवकरच बाजारात येणार आहेत.

या स्पर्धेतून केवळ कल्पना मांडल्या जात नाहीत, तर त्या प्रत्यक्ष उत्पादनात उतरून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची क्षमता ठेवतात. यंदाच्या स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही श्री. फडणवीस यांनी दिली. प्रदर्शनात शेतीतील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापराबाबत उपयुक्त नवकल्पना आहेत. उपग्रह नकाशांकन आणि मृदा परीक्षणाच्या आधारे जमिनीचे अचूक विश्लेषण करणारे नमुने, शेताच्या रचनेनुसार ओलावा व्यवस्थापन करून आवश्यक तेवढाच पाणीपुरवठा करणारी यंत्रणा, तसेच तण आणि पीक ओळखून स्वतंत्र फवारणी करणारे तंत्रज्ञान अशा विविध संकल्पनांचे मुख्यमंत्री यांनी विशेष कौतुक केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असून भविष्यात त्याची अचूकता आणखी वाढेल. पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी मानवरहित यंत्रे आणि उपग्रह नकाशांकनाच्या माध्यमातून अचूक अहवाल तयार करणारे तंत्रही उपयुक्त ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, बदलते हवामान, पाण्याची कमतरता, खतांची टंचाई, मजुरांची कमतरता आणि बाजारभावातील चढ-उतार या विविध आव्हानांना सामोरे जाताना कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. नवोपक्रमांना चालना देण्यासाठी आणि जागतिक पातळीवरील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रदर्शनाची पाहणी;नवकल्पनांचे कौतुक

**पुणे ॲग्री हॅकॅथॉन-२०२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. प्रत्येक स्टॉलवर थांबून त्यांनी संशोधकांशी आणि युवा उद्योजकांशी थेट संवाद साधत त्यांच्या संकल्पना समजून घेतल्या आणि त्यांच्या संशोधनाचे कौतुक करीत प्रोत्साहनही दिले. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाययोजना, स्मार्ट सिंचन प्रणाली, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा परीक्षण, स्वयंचलित उपकरणे तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध संशोधनात्मक प्रकल्पांविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्सुकतेने माहिती घेतली. प्रकल्प सादर करणाऱ्या तरुणांच्या कल्पकतेचे त्यांनी कौतुक करत कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोठे परिवर्तन घडवून आणण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी त्यांनी विविध उपकरणांची कार्यपद्धती समजून घेत संशोधकांना प्रोत्साहनपर प्रश्न विचारले. अनेक स्टॉलवरील संशोधन प्रत्यक्ष पाहून त्यांनी अशा उपक्रमांमधून राज्यातील युवकांना नवसंशोधनासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे अधोरेखित केले.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### संत रविदासांच्या विचारांचा प्रसार होणे आवश्यक : मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतीय आध्यात्मिक परंपरेतील महान संत रविदास यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि कार्य अत्यंत प्रेरणादायी व समाजप्रबोधनात्मक असून, त्यांचा व्यापक अभ्यास आणि प्रसार होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या विद्यापीठातील ‘स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस’ विभागाने तयार केलेल्या संशोधन प्रकल्पाची केंद्र सरकारकडे तातडीने शिफारस करण्यात यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांस्कृतिक कार्य विभागास दिले. संत रविदास यांचे भारतीय तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि भक्ती परंपरेतील योगदान महत्त्वपूर्ण असूनही त्यांच्या कार्याचे अपेक्षित प्रमाणात संशोधन झालेले नाही. आजच्या तरुण पिढीसमोर त्यांचे विचार प्रभावीपणे मांडण्याची आवश्यकता असून ते समाजासाठी प्रेरणादायी ठरू शकतात, असे मत मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केले. भक्ती परंपरेतील संत रविदास यांचे सातत्यपूर्ण अस्तित्व तसेच गुरु ग्रंथ साहिब यांसारख्या प्रमाणग्रंथांमध्ये त्यांच्या रचनांचा समावेश असूनही त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास अपेक्षित प्रमाणात झालेला नाही. या पार्श्वभूमीवर डेक्कन एज्युकेशन सोसायटी विद्यापीठाच्या ‘स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस’ विभागाने संत रविदास यांच्या तत्त्वज्ञान, सामाजिक विचार आणि सांस्कृतिक वारशाचा अभ्यास करून एक संशोधन प्रकल्प तयार केला आहे.

### रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करा

**मुंबई : हॅलो प्रभात**



ग्रामीण भागातील स्ट्रोक रुग्णांना ‘गोल्डन अवर’ मध्ये तातडीने आणि अत्याधुनिक उपचार देण्यासाठी ‘रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन’ हा दूरस्थ पद्धतीने रोबोटिक उपचार सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. गेल्या काही वर्षांत स्ट्रोक (पक्षाघात) रुग्णसंख्येत वाढ होत आहे. अशा रुग्णाना ‘गोल्डन अवर’मध्ये उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशावेळी तज्ज्ञ डॉक्टर व आधुनिक सुविधा वेळेत न मिळाल्यास रुग्णाला कायमस्वरूपी पक्षाघाताचा धोका वाढतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन तालुका व जिल्हास्तरीय शासकीय रुग्णालयांमध्ये स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक ‘रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन’ उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याचा आरोग्यमंत्र्यांचा मानस आहे.

## छ. संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचे अनावरण




**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आलेल्या बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, महापौर मंजुषा नागपुरे, उप महापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेता गणेश बिडकर, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज यांचे ‘बुधभूषण’ ग्रंथ रचतानाचे विश्वातील पहिले १० फुट उंचीचे पूर्णाकृती कांस्य शिल्प महाराष्ट्रात प्रथमच पुणे महानगरपालिकेच्यावतीने शिवाजीनगर येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आले आहे. या प्रकल्पास एकूण ५ कोटी इतका खर्च झालेला आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचे ‘बुधभूषण’ ग्रंथातील श्लोक निवडण्याकरिता इतिहास तज्ज्ञ, संस्कृत-मराठी भाषातज्ज्ञ, अभ्यासक यांची इतिहास तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आलेली होती.

## हवामान केंद्राच्या डेटामध्ये तफावत

### अवकाळी पावसाच्या नोंदींची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

■ संजयकाका पाटील यांचे कृषिमंत्र्यांना निवेदन

**तासगाव : हॅलो प्रभात**

सांगली जिल्ह्यातील हवामान केंद्रांच्या अवकाळी पावसाच्या नोंदींमध्ये मोठी तफावत आढळल्याचा आरोप करत सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात माजी खासदार संजयकाका पाटील यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तासगाव तालुक्यातील विसापूर व येळावी येथे 22 एप्रिल 2026 रोजी झालेल्या अवकाळी पावसाची नोंद खाजगी हवामान कंपनीकडून वेगवेगळ्या वेळेस वेगवेगळ्या प्रमाणात दर्शविण्यात आली आहे. एकाच दिवशी पावसाच्या नोंदींमध्ये मोठी तफावत आढळल्याने संशय निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



संबंधित अहवाल स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. या खाजगी संस्थेकडून कृषी विभागाकडे सादर करण्यात आले होते. मात्र 10.16 वाजता आणि नंतर 4.59 वाजता प्राप्त अहवालांमध्ये पावसाच्या आकडेवारीत लक्षणीय बदल दिसून आल्याचा दावा करण्यात आला आहे.

पीक विमा योजनेंतर्गत (2025-26) या अहवालांवर आधारित नुकसानभरपाई निश्चित केली जात असल्याने कमी आकडेवारी गृहित धरल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे, असा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व हवामान केंद्रांच्या डेटाची सखोल तपासणी करून संपूर्ण अहवालांची शहानिशा करावी, तसेच संबंधित खाजगी कंपनीच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकारामुळे पीक विमा भरपाई प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शेतकरी वर्गात संभ्रमाचे वातावरण आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावरील टोल वसुलीला मंत्री आदिती तटकरेंचा विरोध

मुंबई (हॅलो प्रभात) : मागील १४ वर्षांपासून सुरू असलेल्या मुंबई-गोवा महामार्ग अद्याप पूर्ण झाला नसतानाच टोलवसुलीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असताना राजकीय पक्षांकडूनही या टोलवसुलीला विरोध होत आहे. शिवसेना (ठाकरे), शेकापपाठोपाठ आता राष्ट्रवादीच्या (अजित पवार) मंत्री आदिती तटकरे यांनीही या टोलवसुलीला विरोध केला असून यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन टोलवसुली स्थगित करण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्याप मोठ्या प्रमाणात अपूर्ण असताना सिंधुदुर्गातील ओरोस येथे तसेच रायगड जिल्ह्यातील खारपाडा येथे टोलवसुली सुरू करण्याची तयारी केंद्रीय रस्ते वाहतूक विभागाकडून करण्यात आली. त्यात खारपाडा येथे टोलवसुली सुरूही झाल्याने या अन्यायकारक टोलवसुलीविरोधात नागरिकांनी आवाज उठविण्यास सुरुवात केली आहे. यात आता राजकीय पक्षही सामील झाले असून मंत्री आदिती तटकरे यांनी या टोलवसुलीला विरोध दर्शवत, कामे पूर्ण होण्यापूर्वी नागरिकांवर आर्थिक भार टाकणे योग्य नसल्याचे म्हटले आहे. महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतरच टोलवसुली सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

## *पुण्याला देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न : मुख्यमंत्री*

**पुणे : हॅलो प्रभात**



पुणे शहराला देशाचे ‘ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर’ म्हणून ओळख मिळत असून ती पुढे नेण्यासाठी मेट्रोचे जाळे, रस्त्यांची सुधारणा, भूमिगत बोगद्यांचे जाळे तयार करणे आदी माध्यमातून उत्तम वाहतुकीची व्यवस्था, चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्तम जीवनशैली सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुणे शहरात हाती घेतलेले प्रकल्प पुढील ३ ते ४ वर्षात पूर्ण झाल्यानंतर देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून ओळखले जावे यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही ते म्हणाले. मोहम्मदवाडी येथील समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या साठवण टाक्यांचे लोकार्पण तसेच मुंढवा येथील महात्मा फुले चौक ते खराडी मेट्रो समवेत दुमजली उड्डाणपुलाचे ऑनलाईन भूमिपूजनासह विविध प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजननिमित्त रहेजा चौक, दोराबजी मॉल जवळ, मोहम्मद वाडी हडपसर येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार योगेश टिळेकर, चेतन तुपे, भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते. पुण्याचा नवीन विमानतळ, नवीन रिंग रोड, हडपसर पासून यवतपर्यंत आधुनिक प्रकारचा उन्नत मार्ग आदी सर्व माध्यमातून पुण्याची जोडणी चांगली करण्याचा प्रयत्न आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, गतवर्षी एकट्या पुण्यात देशातील २५ टक्के जीसीसी तयार झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रानंतर पुढील लाट जीसीसीची असून त्यात पुणे पुढे चालले आहे. ते पुढे नेण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुण्याला एक आधुनिक शहर म्हणून पुढे नेण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. महात्मा फुले चौक ते खराडी हा मेट्रोसह दुमजली पूल उभारण्यात येत असून त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यासह प्रवासातील १५ ते २० वाचणार आहेत. पुण्याला गतिमान करण्याच्या प्रयत्नातील हा एक महत्वाचा पूल आहे. कोंढवा परिसरातील रखडलेल्या कात्रज कोंढवा रस्त्याचे येत्या ६ महिन्यात भूसंपादन होऊन हा रस्ता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले. देशातील पहिले पीपीपी तत्वावर दर्जेदार आरोग्य सेवा उभी करता येते हे या कर्करोग उपचार रुग्णालयाच्या उभारणीवरून दिसून येते. राज्यात मोठ्या प्रमाणात कॅन्सर ग्रीड तयार करण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न सुरू आहे. या ग्रीडच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला कॅन्सरवरील आधुनिक उपचार वेळेत आणि अत्यल्प दरात वा मोफत मिळाला पाहिजे असे प्रयत्न सुरू आहेत.

## कर्करोग रुग्णालय आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार - मुख्यमंत्री

**पुणे : हॅलो प्रभात**


अत्याधुनिक कर्करोग केंद्राच्या लोकार्पणप्रसंगी मुख्यमंत्री श्री फडणवीस बोलत होते.

पुणे महानगरपालिकेच्या जागेवर सामाजिक बांधिलकी जपत उभारण्यात आलेले अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय हे आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पाऊल असून सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून निर्माण झालेले हे केंद्र आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमातून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कर्करोग केंद्राच्या लोकार्पण. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, आमदार राहुल कुल, उपमहापौर परशुराम वाडेकर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कर्करोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत आहे. वेळेत निदान आणि उपचार मिळाल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र उपचारात विलंब झाल्यास रुग्णांना दीर्घकाळ उपचार घ्यावे लागतात आणि त्यासाठी मोठा आर्थिक खर्चही करावा लागतो. हीच बाब लक्षात घेत सर्वसामान्य नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांमध्ये कर्करोग उपचारांचा समावेश केला आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर ‘कर्करोग ग्रीड’ तयार करण्यात येत असून या माध्यमातून राज्यातील रुग्णांना अधिक सक्षम आणि सुलभ उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्यभरातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि समन्वयित करण्यासाठी हे ग्रीड महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. पुणे महानगरपालिका आणि आपुलकी फाउंडेशनच्या माध्यमातून सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारण्यात आलेल्या या उपक्रमाचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कौतुक केले. कार्यक्रमास महानगपालिकेचे पदाधिकारी, आपुलकी फाउंडेशनचे पदाधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते. तत्पूर्वी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी रुग्णालयाची पाहणी करून विविध उपचार विभाग, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे तसेच रुग्णांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची माहिती जाणून घेतली.

## महिला लोकशाही दिनाचे १८ मे रोजी आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा, यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत जिल्हास्तरावर आयोजित महिला लोकशाही दिनाचे सोमवार, १८ मे २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळीत आयोजित या कार्यक्रमात महिलांच्या तक्रारी, अडचणी व निवेदनांवर शासकीय यंत्रणेमार्फत मार्गदर्शन व सोडवणूक केली जाणार आहे. महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करण्यासाठी आवश्यक अर्जाचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ११७ बी.बी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई - ४०००१८ येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे.



# मसाज पार्लर चालकाकडून खंडणी उकळण्याचा प्रयत्न

## खराडी पोलिसांची पाच जणांवर कारवाई

**वाघोली : हॅलो प्रभात**

खराडी परिसरातील मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याचा बनाव करून स्पा चालकाला धमकावत दोन लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांना खराडी पोलीस ठाणे पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये तीन पुरुष व दोन महिलांचा समावेश असून त्यांच्याकडून रोख रक्कम व दुचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडी येथील सिटी व्हिस्टा बिल्डिंगमधील 'फिल टच स्पा' येथे बुधवारी सायंकाळी आरोपी गेले. त्यांनी स्पामध्ये अवैध प्रकार सुरू असल्याचा आरोप करत स्पा चालकाला शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची धमकी देत दोन लाख रुपयांची मागणी केली.

फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी मारहाण करत तडजोडीअंती दीड लाख रुपयांवर व्यवहार ठरवला. त्यापैकी ३० हजार रुपये ऑनलाइन स्वीकारण्यात आले असल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथके तयार करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे वाघोली परिसरातून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या माहितीवरून उर्वरित चौघांना अटक करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र गोडसे करीत आहेत. पुढील कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**धमकी देत खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तीला खराडी पोलीस कोणत्याही परिस्थितीत खपवून घेणार नाहीत. मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याचा बनाव करून स्पा चालकाला धमकावणे, मारहाण करणे आणि पैशांची मागणी करणे हा गंभीर गुन्हा आहे. अशा प्रकारे स्वतःला सामाजिक कार्यकर्ते म्हणवून कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींना अल्पावधीत अटक करण्यात आली असून, अशा खंडणीखोर टोळ्यांविरोधात पुढेही कठोर मोहिम सुरू राहील.**

**- संजय चव्हाण (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खराडी)**

# कत्तलखान्याविरोधात गोरक्षक आक्रमक

## दोषींवर कारवाईची मागणी

**बारामती शहर : हॅलो प्रभात**

शहरातील शासकीय अधिकृत 'म्हैस वर्गीय' कत्तलखान्यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता, बेकायदेशीर कत्तल आणि पर्यावरणीय नियमांचा सर्रास भंग सुरू असल्याचा गंभीर आरोप करत मानद पशुकल्याण अधिकारी शिवशंकर राजेंद्र स्वामी व हिंदुत्ववादी प्रखर नेते प्रशांत नाना सातव यांनी बारामती नगरपरिषद प्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. संबंधित कत्तलखाना तात्काळ बंद, सील अथवा उध्वस्त करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

मुख्याधिकारी पंकज भुसे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर कत्तलखान्यास मर्यादित प्रमाणात म्हैस वर्गीय जनावरांच्या कत्तलीची परवानगी असताना प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जात असल्याचा आरोप आहे. शासनाने घालून दिलेल्या नियमांचे उघड उल्लंघन करून मोठ्या प्रमाणावर मांस शहराबाहेर पाठविले जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासह इतर आवश्यक विभागांच्या वैध परवानग्या उपलब्ध नसल्याचा गंभीर दावा करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चा उल्लेख करत शेतीसाठी उपयुक्त जनावरांचीही बेकायदेशीर कत्तल होत असल्याचा आरोप करण्यात आला असून हा प्रकार कायद्याला थेट आव्हान देणारा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, कत्तलखान्यात दररोज कापल्या जाणाऱ्या जनावरांची अधिकृत नोंद, वैद्यकीय तपासणी, वाहतूक नोंदी आणि कत्तलीचे अधिकृत रेकॉर्ड उपलब्ध नाहीत.

माहिती अधिकारातून माहिती मागवूनही नगरपरिषदेकडे कोणतीही स्पष्ट अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण कारभार संशयास्पद व बेकायदेशीर पद्धतीने सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय कत्तल केलेल्या जनावरांचे रक्त, सांडपाणी आणि जैविक कचरा थेट नदीपात्रात सोडला जात असल्याने नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होत आहे.

यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून दुर्गंधी, अस्वच्छता, जलप्रदूषण आणि संसर्गजन्य रोगांचा धोका वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन संबंधित कत्तलखान्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्रांताधिकारी यांच्याकडेही करण्यात आली आहे.

यावेळी प्रशांत नाना सातव, शिवशंकर राजेंद्र स्वामी, ॲड. माने तसेच मोठ्या संख्येने गोरक्षक व गोप्रेमी उपस्थित होते.



# आरक्षण उपवर्गीकरणासाठी मातंग समाजाचे २० मे ला आंदोलन

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

अनुसूचित जातीतील उपेक्षित घटकांना न्याय मिळावा तसेच 'अ, ब, क, ड' आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, या मागणीसाठी पाथर्डी तालुक्यातील मातंग समाज आक्रमक झाला आहे. या मागणीसाठी २० मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पाथर्डी तहसील कार्यालयावर लाक्षणिक आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून होणार आहे. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाकडे निवेदन सादर केले असून अनुसूचित जातीतील काही घटक आजही आरक्षणाच्या लाभापासून वंचित असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मातंग समाज सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागे पडत असल्याने उपवर्गीकरण हा न्यायाचा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "उपेक्षितांना न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात विद्यार्थी, महिला, युवक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शासनाने आरक्षण उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

# कंत्राटी कामगारांचा स्वच्छ, सुंदर बारामती करण्यात मोलाचा वाटा

**बारामती : हॅलो प्रभात**

बारामती नगर परिषद मध्ये कंत्राटी कामगार काम करीत असताना अनेक अडचणींना सामोरे जात असतात.मात्र याकडे कोणी लक्ष देत नाही. तरीदेखील कंत्राटी कामगार या अडचणींना सामोरे जाऊन दिलेले काम करत असतात.या कामगारांचे आरोग्य चांगले राहून काम करतील यासाठी कधी उपाययोजना नाही. काम जास्त आणि पगार कमी त्याचबरोबर कामगारांवर वेगवेगळे नियम लादणे सुरुच असते.

कंत्राटी कामगार सुधा बारामतीकर आहे. हे विसरून चालणार नाही. कंत्राटी कामगार बारामतीचे मतदार आहेत. पण या मतदारांच्या हिताचे निर्णय सत्ताधारी कधीच घेताना दिसत नाहीत. कामगारांना त्याच्या कामाचा मोबदला न मिळता ठेकेदाराला फायदा होत असेल तर ही पध्दत चुकीची आहे. या पद्धतीमध्ये बदल करण्याचा सत्ताधाऱ्यांनी विचार केला पाहिजे.

जनशक्ती कंत्राटी कामगार संघाच्या वतीने कंत्राटी कामगारांची बैठक संपन्न झाली.



बारामती येथे कंत्राटी कामगारांवर सुरू असलेल्या अन्याया बाबत यावेळी चर्चा झाली. कामगारांना किमान वेतन,महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पगार,पी. एफ.,ई. एस.आय.एस. दिला पाहिजे.काही तांत्रिक ,आणि प्रशासकीय बाबी वर यावेळी चर्चा झाली. बारामती नगर परिषद कंत्राटी कामगार यांचा बारामती स्वच्छ करण्यामध्ये मोठा वाटा आहे. त्याबाबत त्यांना कधीही सन्मान मिळत नाही. त्यांची कायम पिळवणूक होत आहे.ही पिळवणूक थांबलीच पाहिजे. यासाठी जनशक्ती कंत्राटी कामगार संघ लढा देणार आहे.असे जनशक्ती कंत्राटी कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष गौरव अहिवळे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# हिमोफिलिया रूग्णांसाठी उपचाराबरोबर व्यायामला महत्व

## डॉं. गोपाळ बहुरूपी

**पारनेर : हॅलो प्रभात**

हिमोफिलिया हा ७० टक्के अनुवांशिक व ३० टक्के बदलते जनरेशनमुळे होत असल्याने जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान विकसीत झाले असून उपचाराबरोबर व्यायामालाही तितकेच महत्व असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगरचे प्रसिध्द रक्तविकार तज्ञ डॉं.गोपाळ बहुरूपी यांनी केले.

अहिल्यानगर येथे शुक्रवार दि. १५ मे २०२६ आयोजित जागतिक हिमोफिलिया दिनानिमित्त ते बोलत होते. याप्रसंगी बालरोग तज्ञ डॉं.चेतना बहुरूपी, हिमोफिलिया फेडरेशन ऑंफ इंडिया नवी दिल्ली चे युथ चेअरमन सौरभ नलमवार, हिमोफिलिया फेडरेशनचे माजी उपाध्यक्ष रामू गडकर, डॉं. अशोक ठाकरे, डॉं. रूपाली कुलकर्णी,डॉं. अमृता गवळी, डॉं. भाऊसाहेब खिलारी, हिमोफिलिया सोसायटी अहिल्यानगर चॅंप्टरचे अध्यक्ष दादा भालेकर,आसाराम तळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी डॉं.बहुरूपी बोलताना म्हणाले की,पुर्वी निदाना अभावी हिमोफिलिया रूग्ण दगावण्याचे प्रमाण फार मोठे होते मात्र जसजसे तंत्रज्ञान वाढत गेले तसे हिमोफिलिया बाबत जागतिक पातळीवर जिन थेरपी,नॉंन फॅंक्टर थेरपी बरोबर नव्याने येत असलेल्या टॅंबलेट व अत्याधुनिक फॅंक्टर ची उपलब्धतेमुळे हिमोफिलिया रूग्णांचे जिवन सुखकर झाले आहेत.

याप्रसंगी सौरभ नलमवार म्हणाले की, निदाना नंतर उपचार पध्दती काळजीची पहिली पायरी असून याप्रसंगी डॉं.चेतना बहुरूपी बोलताना म्हणाले की, मनुष्य शरिराने विकलांग नसून बध्दीने विकलांग झाला तर काहीही करू शकत नाही याला अपवाद हिमोफिलिया परिवार असून तो बुध्दीने हुशार आहेत. बाल्य अवस्थेत हिमोफिलियाबाबत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी डॉं.अशोक ठाकरे यांनी हिमोफिलिया रूग्णांना फिजिओथेरपी किती महत्वाची आहेत याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉं.रूपाली कुलकर्णी यांनी हिमोफिलिया रूग्णांसाठी सुवर्णकाळ सुरू झाला असून रूग्णांना तातडीने लागणारे फॅंक्टर २४ तास उपलब्ध असल्याने हिमोफिलिया रूग्णांचे जिवनमान वाढणार आहेत. डॉं.अमृता गवळी,डॉं.भाऊसाहेब खिलारी,दादा भालेकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमास डॉं.ज्ञानदेव आव्हाड,अरूण पानसंबळ,सचिन देऊळगावकर,शुभम कदम,श्रृति कुकडे,संगिता कदम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रामू गडकर यांनी तर आभार आसाराम तळेकर यांनी मानले.

# आत्मा मालिकचा रितेश लटपटे राज्यात प्रथम

**कोपरगाव: हॅलो प्रभात**

आत्मा मालिक सेमी इंग्लीश मिडीयम गुरूकुल विद्यालयाने सलग पाचव्या वर्षी आपला डंका राज्यपातळीवर वाजवीला. रॅंशनॅलिस्ट टॅंलेंट सर्च परीक्षेत सलग पाचव्या वर्षी राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवीला. यंदा या परिक्षेत रितेष लटपटे याने राज्यात पहिला क्रमांक पटकावला. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद व आरटीएसई फाउंडेशन यांच्यावतीने हि परीक्षा घेण्यात येते. याबाबत माहिती देताना प्राचार्य निरंजन डांगे म्हणाले, या परिक्षेत विद्यालयाचा सार्थक शिंदे याने राज्यात तिसरा, स्वराली काळे हीने अहिल्यानगर जिल्ह्यात पहिला, साहिल बोरुडे व वैभवी जाधव हिने दुसरा तसेच कार्तिक शेटे व आयुष वामन याने जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभागप्रमुख अनिल सोनवणे, सचिन डांगे पर्यवेक्षक नयना आदमाने, गणेश रासने आणि विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे आदिंनी अभिनंदन केले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये २३ विद्यार्थ्यांची निवड

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालय, कोपरगाव येथे करिअर काउन्सेलिंग अँड प्लेसमेंट सेल व आय.क्यू.ए.सी. विभागाच्या वतीने आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये विविध पदांसाठी २३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी दिली. या ड्राइव्हमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर्स पदासाठी ०४ विद्यार्थ्यांची तर बिझनेस डेव्हलपमेंट असोसिएट्स पदासाठी १९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. निवड झालेल्या २३ विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी महाविद्यालय सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करत असून, भविष्यातही अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच त्यांनी नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. संदीप वर्पे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, मा. सौ चैताली ताई काळे, मा. आमदार विवेक कोल्हे, मा. श्री सुनील गंगुले, मा. श्री बाळासाहेब आव्हाड,कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ.घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दिलीप भोये, कार्यालय अधीक्षक श्री. सुनील गोसावी तसेच सर्व विभाग प्रमुख यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

### देवळाली प्रवरात डॉ. आंबेडकरांचे स्मारक उभारण्याची मागणी

**देवळाली प्रवरा : हॅलो प्रभात**

■ नगरसेविका पल्लवी ढूस यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देवळाली प्रवरा नगरपरिषद हद्दीतील प्रसादनगर येथे भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका पल्लवी वैभव ढूस यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाठ, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील तसेच आमदार हेमंती ओगले यांनाही देण्यात आल्या आहेत. दिलेल्या निवेदनात ढूस यांनी म्हटले आहे की, डॉ.आंबेडकरांनी सामाजिक समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांसाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजाला मिळावी, नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ७, प्रसादनगर येथे भव्य स्मारक उभारणे आवश्यक आहे.

# शेवगावमध्ये पाणीटंचाई तीव्र; नागरिकांना १६ दिवसांनी पाणी

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

■ डिव्हायडरवरील झाडेही तहानलेली

■ प्रशासनाच्या नियोजनावर नागरिकांचा सवाल


शेवगाव शहरात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून नागरिकांना तब्बल १६ दिवसांनी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. एका बाजूला नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नसताना, दुसऱ्या बाजूला शहरातील मुख्य रस्त्यांवरील डिव्हायडरवर लावलेली झाडेही पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शहरातील अनेक भागांत नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना तसेच लहान मुलांना दूरवरून पाणी आणावे लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे स्वच्छतेच्या समस्या देखील दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. दरम्यान, शहर सुशोभीकरणासाठी मुख्य रस्त्यांच्या डिव्हायडरवर लावण्यात आलेली झाडेही पाण्याअभावी कोमेजलेली दिसत आहेत. अनेक ठिकाणी झाडांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने ती सुकण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत. विशेष म्हणजे या झाडांसाठी एका टॅंकर पाण्याचीही व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. शासनाकडून वृक्षलागवडीसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो, मात्र लागवडीनंतर झाडांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. सत्ताधारी आणि विरोधी लोकप्रतिनिधी मात्र फक्त बघ्याची भूमिका घेत असून या ज्वलंत प्रश्नावर मूग गिळून गप्प असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. शहरातील नागरिकांना १६ दिवसांनी पाणी देणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना त्रास सहन करावा लागत असताना प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. कोल्हे यांनी मांडले जनतेचे प्रश्न

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार ऑनलाईन स्वरूपात जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत आमदार विवेक कोल्हे यांनी जनतेच्या दैनंदिन अडचणी आणि मूलभूत प्रश्न अत्यंत ठामपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या वीज प्रश्नावर बोलताना आ. कोल्हे यांनी ग्रामीण भागात सुरू असलेल्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले. विशेषतः रात्रीच्या वेळेस शेतीपंपासाठी पूर्ण दाबाने आणि नियमित वीजपुरवठा मिळावा, तसेच भारनियमन कमी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यासोबतच अनेक गावांमध्ये सिंगल फेज वीजपुरवठाही सुरळीत होत नसल्याने नागरिक त्रस्त असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. उन्हाळ्याच्या दिवसांत रात्रीच्या वेळी फॅनसारखी घरगुती उपकरणेही बंद राहत असून लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.



वाहतूक कोंडीच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधताना आ. कोल्हे म्हणाले की, संवत्सर येथील पुलाचे काम सुरू असल्याने नागपूर-मुंबई महामार्गावरील मोठ्या प्रमाणातील वाहतूक नगर-मनमाड महामार्गावरील कोपरगाव-पुणतांबा फाटा मार्गे वळविण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय आधार केंद्रांच्या अपुऱ्या संख्येमुळे नागरिकांना आधार कार्ड काढणे तसेच दुरुस्तीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांची अधिकच हेळसांड होत असल्याचे सांगत आधार केंद्रांची संख्या वाढविण्याची मागणी त्यांनी केली.

या बैठकीस पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.